| लातूर | वर्ष ३५ वे | अंक २० वा | गुरूवार, दिनांक ०२ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## ४० पेट्रोकेमिकल्स उत्पादनांवरील संपूर्ण सीमा शुल्क माफ

### अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा मोठा निर्णय





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या एक महिन्यापासून सुरू असलेलं अमेरिका-इराण युद्ध अद्यापही पूर्णपणे थांबलेलं नाही. मात्र, हे युद्ध थांबवण्यासाठी सध्या हालचाली सुरू असल्या तरी युद्ध नेमकं कधी थांबणार? याबाबत सध्या तरी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. कारण डोनाल्ड ट्रम्प हे एकीकडे युद्ध संपवण्याचे संकेत देत आहेत आणि दुसरीकडे पुन्हा इराणवर हल्ला करण्याचा इशारा देत आहेत. त्यामुळे हे युद्ध केव्हा संपणार? या बाबतचा संभ्रम निर्माण झाला आहे.

या युद्धामुळे संपूर्ण पश्चिम आशियात तणाव आहे. होर्मुझ सामुद्रधुनीमध्येही तणाव असल्याने कच्च्या तेलाच्या निर्यातीत अडथळे येत आहेत. त्यामुळे याचा परिमाण इंधन आणि गॅसच्या पुरवठ्यावर होत आहे. याचा फटका भारतालाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. या युद्धाचा फटका भारतातील अनेक लघु, सूक्ष्म उद्योगांना बसत असून पक्क्या मालाची निर्यात आणि कच्च्या मालाच्या आयातीला अडचणी येत आहेत. त्यामुळे अमेरिका-इराण युद्धाच्या झळा भारतातील काही कंपन्यांनाही सोसाव्या लागत आहेत.

या पार्श्वभूमीवरच आज केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत उद्योगांचं संरक्षण करण्यासाठी केंद्रीय अर्थ मंत्रालयाने अनेक महत्त्वाच्या पेट्रोकेमिकल्स उत्पादनांवरील संपूर्ण सीमा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माफी ३० जून २०२६ पर्यंत लागू असणार असल्याचे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, कच्च्या मालाचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी आणि सर्व क्षेत्रांमधील महागाई नियंत्रणात राहण्यासाठी जवळपास ४० पेट्रोकेमिकल्स उत्पादनांवरील संपूर्ण सीमा शुल्क माफ करण्याची ही एक तात्पुरती उपाययोजना आहे. कारण अमेरिका-इराणमधील वाढता तणाव, होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांना असलेला धोका आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवरील तुरळक हल्ले, यामुळे निर्माण झालेल्या पश्चिम आशियातील संकटाचा जागतिक व्यापारावर परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने हा निर्णय घेतला असल्याचं सांगितले जात आहे.

केंद्र सरकारने म्हटले की, ४० पेट्रोकेमिकल्स उत्पादनांवरील संपूर्ण सीमा शुल्क माफीच्या निर्णयामुळे प्लास्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, रसायने आणि वाहन निर्मिती यांसारख्या उद्योगांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल. तसेच ग्राहकांवरील भारही कमी होईल.

## सर्वाधिक ध्रुवीकरण झालेलं राज्य', सर्वोच्च न्यायालयाने बंगाल सरकारला फटकारलं

### SIR अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्या प्रकरणी सैन्य तैनात करण्याचे आदेश



**कोलकाता/वृत्तसंस्था : :** गेल्या काही दिवसांपासून मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी अर्थात एसआयआरचा मुद्दा देशभरात चर्चेत आहे. यावरून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाद उद्भवल्याचं पाहायला मिळालं. या पार्श्वभूमीवरच पश्चिम बंगालमधील एसआयआरचा मुद्दा थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेला आहे. यातच काही दिवसांपूर्वी एसआयआरच्या काही अधिकाऱ्यांना एका कार्यालयात ओलीस ठेवल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणावरून आता सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारला फटकारलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालमधील परिस्थितीवर भाष्य करत चिंता व्यक्त केली आहे.

पश्चिम बंगालमधील मालदा या ठिकाणी एसआयआर प्रक्रियेदरम्यान काही अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या घटनेवर सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की, 'तीन महिलांसह सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवण्याची घटना निंदनीय आहे.'

दरम्यान, यावेळी सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल हे सर्वाधिक ध्रुवीकरण झालेलं राज्य असल्याचं म्हटलं आहे. तसेच एसआयआर प्रक्रियेदरम्यान काही अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याची ही घटना पूर्वनियोजित आणि हेतुपुरस्सर असल्याचंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान काही न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याच्या या घटनेचा तपास एनआयए किंवा सीबीआयकडे सोपवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. या बरोबरच आता एसआयआरची प्रक्रिया करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी केंद्रीय सुरक्षा दल तैनात करण्याचे निर्देश देखील सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

**सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काय म्हटलं?**

या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी म्हटलं की,पश्चिम बंगालमध्ये प्रत्येकजण फक्त राजकीय भाषा बोलत आहे. मी स्वतः पहाटे २ वाजेपर्यंत परिस्थितीवर लक्ष ठेवून होतो. त्यामुळे यामागे कोण आहे हे आम्हाला माहिती आहे. पश्चिम बंगाल हे देशातील सर्वात ध्रुवीकरणाने ग्रासलेलं राज्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने काय आदेश दिले?

-निवडणूक आयोगाने न्यायिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षित कामकाजाची खात्री करण्यासाठी केंद्रीय दल तैनात करण्याचे आदेश दिले आहेत.

-न्यायिक अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी देखील केंद्रीय दल तैनात करण्याचे आदेश दिले आहेत.

-कोणत्याही न्यायिक अधिकाऱ्याला किंवा त्यांच्या कुटुंबियांना कोणताही धोका निर्माण झाल्यास तात्काळ परिस्थितीचं मूल्यांकन करून सुरक्षा उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले आहेत.

-निवडणूक आयोग आणि राज्य सरकारने न्यायिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षित कामकाजासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

-न्यायालयाने गृह सचिव, डीजीपी, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांना सुनावणीदरम्यान आक्षेप नोंदवण्यासाठी फक्त २ किंवा ३ लोकांनाच प्रवेश देण्याचे निर्देश दिले आहेत.

रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार
www.latursamachar.com

### प्रभात किरणे

खरंच कधी देव तयार करता येतो? खरंच देवाची मूर्ती विकत घेता येतं? खरंच देवाला बघता येतं? ऐकू येत? सारच खरं,येथे विपरीत का घडतं ?
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर
९१-९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



वस्तू आणि सेवा करात ८.८% वाढ...

### चिमटा



दयाचा गरीब कोणी राहिले नाही ! पाणपोईची गरज उरली नाही !! पैसे मोजल्यावर थंड पाण्याची बाटलीची सोय सर्वत्र झाली आहे !!!

## अवकाळीची भीती, देवणी तालुक्यात कांदा काढणीची घाई

### तालुक्यात ४८ हेक्टरवर कांदा; मजूर टंचाईचा फटका, एका एकराच्या काढणीस १६ हजाराचा खर्च



**देवणी/प्रतिनिधी :** सततचे ढगाळ वातावरण, गारपीट व अवकाळी पाऊस यामुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी रब्बी हंगामात लागवड केलेल्या कांद्याच्या काढणीची घाई तालुक्यात सुरू झाली असून मजूर टंचाईमुळे एका एकरातील कांदा काढणीस १६ हजार रूपये खर्च करावा लागत आहे.

तालुक्यात ४८ हेक्टरवर रब्बी हंगामात कांदा लागवड करण्यात आली आहे.काही दिवसांपासून वाढलेले ऊन आणि पडलेला अवकाळी पाऊस यामुळे कांद्याचे पीक लवकर काढणीसाठी आले आहे.यावर्षी वातावरणातील बदलामुळे कांद्याची पात वेळेच्या अगोदर वाळली आहे. त्यामुळे ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात ज्या शेतकऱ्यांनी कांदा लागवड केली होती.ती काढणीस आली असून सततच्या अवकाळी पाऊस, गारपीट व ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यापुढील अडचणीत वाढ झाली आहे.परिणामी पावसामुळे नुकसान होऊ नये याकरिता कांदा काढणीची घाई करावी लागत आहे. शिवाय सध्या बाजारात कांद्यास चांगला दर मिळत असल्यानेही शेतकरी कांदा काढणीची घाई करीत आहेत.

उन्हाचा पारा वाढल्याने मजूर सकाळच्या व संध्याकाळच्या वेळीच कांदा काढणीची कामे करीत असून तात्पुरत्या स्वरूपात कांद्याची साठवणूक करण्यासाठी कापडी मंडप उभारला जात आहे.तर काही शेतकरी कांद्याचे दर घसरण्याच्या भितीने काढलेला कांदा गावोगावी फिरून विकण्यास पसंती देत आहेत.सध्या १५००रूपये प्रती क्विंटल भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण आहे.

साठवणीआधी कांद्यांचे निर्जुंतकीकरण करा कांदा काढणीनंतर शेतात पातीसह सुकू द्यावा.चार-पाच दिवस वाळू द्यावा.नंतर चार सेंमी लांब मान ठेवून पात कापावी.५५ ते ७५ सेंमी जाडीचे कांदे साठवणुकीसाठी चांगले असतात.कांदा चाळीची उंची चार ते पाच फुटांपेक्षा जास्त असू नये. जास्त उंची असल्यास अगदी तळाशी असलेल्या कांद्यावर वजन पडून सड होऊ शकते. कांदा साठवणुकीत खराब होऊ नये,याकरिता साठवणीआधी एक दिवस अगोदर चाळीत बुरशीनाशकाची फवारणी करून निर्जंतुकीकरण करून घ्यावे. सेंद्रिय खताचा वापर अधिक प्रमाणात व रासायनिक खतांचा मर्यादित केलेला असेल तर कांद्याची साठवण क्षमता वाढत असते.

**-प्रियतम कारभारी**
**कृषी सहाय्यक, देवणी**

## निलंग्यात ९९.३२ कोटींच्या भुयारी ड्रेनेज योजनेस गती:आतापर्यंत ३० टक्के काम, आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रकल्प, पायाभूत सुविधेला चालना

**निलंगा/आयुब बागवान :** शहराच्या सर्वांगीण विकासाला नवे बळ देणारी आणि नागरिकांच्या आरोग्यदायी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी भुयारी मलनिस्सारण (ड्रेनेज) योजना सध्या युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. तब्बल ९९.३२ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे निलंगा शहर स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक पायाभूत सुविधांनी सज्ज होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. आतापर्यंत ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. निलंगा नगर परिषदेमार्फत राबविण्यात येणारी ही भुयारी मलनिस्सारण योजना शहराच्या विकासात ऐतिहासिक ठरणारी मानली जात आहे. मराठवाड्यातील नगरपरिषदांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर ड्रेनेज प्रकल्प हाती घेण्याचा मान निलंग्याला मिळाला आहे. या योजनेसाठी माजी मंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सातत्याने पाठपुरावा करून या महत्वपूर्ण योजनेसाठी निधी मंजूर करून घेतला.या योजनेअंतर्गत शहरभर तब्बल १०७ किलोमीटर लांबीचे भुयारी ड्रेनेज जाळे उभारले जात असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हे काम करण्यात येत आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये या कामाची सुरूवात झाली असून आता कामाने वेग घेत असून शहरातील विविध भागांमध्ये काम सुरू असल्याने नागरिकांना लवकरच याचा लाभ मिळणार आहे.

## निलंग्यात वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पाऊस

**निलंगा/आयुब बागवान :** शहरासह तालुक्यात बुधवारी संध्याकाळी अचानक वातावरणात मोठा बदल होत वादळी वारा, विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाने हजेरी लावली. दिवसभर तीव्र उन्हाचा तडाखा सहन करणाऱ्या नागरिकांना सायंकाळी काहीसा दिलासा मिळाला असला, तरी या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या चिंता वाढवल्या आहेत.

सकाळपासूनच प्रचंड उकाडा जाणवत होता. कडक उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले होते आणि सावलीचा आधार घेत दिवस काढत होते. मात्र संध्याकाळी सुमारे आठ वाजेच्या सुमारास अचानक काळे ढग दाटून आले आणि वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसाला सुरुवात झाली.

या अचानक झालेल्या बदलामुळे तालुक्यासह शहरातील नागरिकांची एकच धावपळ उडाली. अनेक ठिकाणी वाऱ्याच्या जोरामुळे झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटना घडल्याचे सांगण्यात आले, तर निलंगा शहरासह तालुक्यातील विविध ग्रामीण भागात वीजपुरवठाही खंडित झाला.

दरम्यान, या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः काढणीस आलेली पिके व वाऱ्यामुळे आडवी पडलेली शेती यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे उन्हाच्या झळांपासून तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी शेतीचे नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने तत्काळ पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाची मटका जुगाराविरुद्ध कारवाई; दोन आरोपी जेरबंद, २४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर व जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाकडून सातत्याने कारवाया केल्या जात आहेत. त्याच अनुषंगाने दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत मटका जुगाराविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईदरम्यान बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार जुना रेणापूर नाका परिसरात काही इसम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लोकांकडून पैसे स्वीकारून कल्याण मटक्याच्या आकड्यावर जुगार खेळत व खेळवित असल्याची माहिती विशेष पथकास प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीची पडताळणी करून विशेष पथकातील अधिकारी व अमलदारांनी अत्यंत शिताफीने सापळा रचून दुपारी १५.४५ वाजता नमूद ठिकाणी अचानक छापा टाकला. छाप्यामध्ये दोन इसम मटक्याचे आकडे लिहून घेताना व पैसे स्वीकारताना आढळून आले. त्यांना तत्काळ ताब्यात घेऊन त्यांची विचारपूस करण्यात आली असता त्यांनी आपली नावे नागेश (वय २४ वर्षे, रा. व्यंकटेश नगर, लातूर) वसीम रा. व्यंकटेश नगर, लातूर) असे असल्याचे सांगितले. त्यांची अंगझडती घेण्यात आली असता आरोपींकडून मटका जुगारासाठी वापरण्यात येणाऱ्या आकड्यांच्या चिठ्ठ्या, रोख रक्कम तसेच दोन मोबाईल फोन असा एकूण २४,३१०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



सदर कारवाईदरम्यान आरोपींकडून करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत त्यांनी हा मटका जुगार परवेज (रा. इंडिया नगर, लातूर) याचे सांगण्यावरून चालवत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार संबंधित बुकी मालकाविरुद्धही कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, १८८७ अंतर्गत कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या सूचनेनुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने यशस्वीरित्या पार पाडली असून, या पथकामध्ये पोउपनि आयुब शेख, श्रेणी पोउपनि उत्तम जाधव, रामहरी भोसले, विशाल गुंडरे, यशवंत घुगे, चामे पोलीस अधिकारी व अमलदार यांचा सक्रिय सहभाग होता.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## व्यावसायिक गॅससिलेंडरच्या दरात वाढ

देशात एक तारखेपासून काही बदल होत आहेत. यात प्रामुख्याने व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किंमतीत वाढ दर्शविली आहे. १९५ रुपयाची वाढ सध्याला दर्शवित आहे. मुळात सर्वाधिक आडचणीत हे व्यावसायिक गॅस सिलेंडर ग्राहक आले आहेत. अनेक खानावली बंद ठेवण्यात आल्या आहेत तर काहींनी पर्याय निवडला असून कमी प्रमाणात व्यावसाय सुरु केला आहे. ईस्त्राईल व इराण दरम्यान युद्धाचा हा परिणाम आहे. भारताने सावध पवित्रा उचलल्याने कमी प्रमाणात झळ बसत आहे. काही देशात गॅस-इंधनाबाबत मोठया प्रमाणात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याच प्रमाणे पैसा असून गॅस सिलेंडर मिळत नाही. चोवीस दिवस म्हणजे एक महिणा थांबावा लागत आहे. काही झाले तरी एका कुटुंबियांना एक महिणा गॅस टाकी घालवावी लागत आहे. शेवटच्या क्षणी गॅस संपला तर काही तरी पर्याय शोधून उपायोजना करावी लागत आहे. मोठी कठिण परिस्थिती आहे. तरी भारतीय नागरिक मोठ्या हिंमतीने संकटाचा मुकाबला करीत आहेत. वास्तविक गॅस व इंधन ही समस्या युद्धामुळे निर्माण झाली आहे. हे सर्वांना माहिती आहे. या बाबी आयात कराव्या लागतात. भारतात निर्माण होत नाहीत. मुळात भारतीयांनी काही पर्याय शोधला पाहिजे. जसे ई-बाईक मध्ये आघाडी घेतली आहे. अनेकांनी इलेक्ट्रिक गाड्या घेतल्या आहेत. सध्याला ईलेक्ट्रिक चार्जर-स्टेशन नाहीत तरीही गाड्या खरेदी करण्याचे प्रमाण बऱ्या प्रमाणात आहे. इंधनाचा साठा हा जमीनीत आहे. तो एक ना एक दिवस संपेल अशी भिती असल्याने आगामी काळात पर्याय शोधला पाहिजे. जगात इंधनाचा पुरवठा करणारा इराण देश आहे. तो खणीज संपन्न देश आहे. अशा देशाकडून अनेक जगातील देश इंधन खरेदी करतात. इराण मध्ये पाणी महाग आहे तर पेट्रोल स्वस्त आहे. आता भारतीयांनी सावध वागणे सुरु केले आहे. इंधनाचा तुटवडा भासू नये, जर सर्वांनी खबरदारीने वागले तर कमतरता भासणार नाही. सर्वांनी इंधनाचा वापर विचारपुर्वक केला पाहिजे. देशात मोठ्या प्रयत्नाने काहि गॅस घेवून जहान पोंहचले आहेत. अजूनही इराण चा भारताला गॅसइंधन देण्यात नकार नाही. तो सुरक्षित आणणे मोठे आव्हान आहे. अशा आव्हानाला तोंड देवून जहाज आणणे दिव्य काम आहे. टंचाईत व्यावसायिकांच्या गॅस दरात वाढ झाली तरी गॅस सिलेंडर मिळाले पाहिजे. व्यावसायिकांनी सुद्धा विचारपुर्वक वापर केला पाहिजे. पर्याय ग्रामीण भागात आहेत. शहरी भागात पर्याय कठिण आहे. ग्रामीण भागात वाळलेला पालापाचोळा व इतर वस्तू इंधन म्हणून मिळू शकतात. त्याचा उपयोग केला पाहिजे. देशात ग्रामीण भागात अजूनही म्हणावा तेवढ्या प्रमाणात गॅसचा वापर केला जात नाही. चुलीवर स्वयंपाक केला जातो. सहज व कधीही उपलब्ध साधन असल्याने त्याचा उपयोग ग्रामीण भागात केला जातो. शहरी भागात सर्वाधिक गॅसचा वापर होतो. तो काळजी पुर्वक होत नसल्याने तुटवडा होणार आहे. गॅस अजूनही मर्यादित वापर केला तर गंभीर समस्या निर्माण होणार नाही. बऱ्याच प्रमाणात गॅस कमी कसा वापरावा या बाबत टिप्सचा उपयोग केला जात नाही. कारण नसताना किंवा वारंवार अन्न पदार्थ गरम करण्यासाठी गॅसचा वापर होतो तो आता करता येणार नाही. किमान एक टाकी महिणाभर घालवावी लागेल. कशा प्रकारे एक महिणा गॅस वापराता येईल या बाबत नियोजन केले पाहिजे. काही वर्षापुर्वी गॅसचा वापर करणारे बोटावर मोजण्याइतकेच मंडळी होती. आताही श्रीमंत असणारी मंडळी चुकीच्या पद्धतीने गॅसचा वापर करीत आहेत. जनसमान्य मंडळींच्या घरी पुन्हा चुली पेटल्या आहेत. मोजकाच स्वयंपाक हा गॅसवर चालू आहे. तसे पाहिले तर व्यावसायीक गॅस सिलेंडरचे वाढले आहेत, आता यदाकदाचित युद्ध अधिक पेटले, परिस्थिती हाता बाहेर गेली तर घरगुती वापरासाठीची गॅस टाकी महाग होवू शकते. या बाबत काही सांगू शकत नाहीत. आपल्या हाती गॅसचा वापर कमीत कसा करता येईल एवढेच आहे. त्याच प्रमाणे सरकार रॉकेल देणार आहे. ते अजून ग्रामीण किंवा शहरात पोंहचले नाही. मोठ्या शहरात रॉकेलचे वितरण चालू असल्याचे सांगण्यात येते. आता सरकारच स्वयंपाकासाठी स्वस्त इंधन म्हणून इथेनॉलचा वापर वाढवण्यासाठी पेट्रोलियम उद्योगाने हालचाली सुरू केल्या आहेत. आयात केल्या जाणाऱ्या महागड्या एलपीजीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि जैवइंधनाचा (बायोफ्युएल) विस्तार करण्यासाठी उद्योगातील सर्व घटकांनी पुढे यावे, असे आवाहन फेडरेशन ऑफ इंडियन पेट्रोलियम इंडस्ट्रीतर्फे (एफआयपीआय) करण्यात आले आहे. यामुळे भविष्यात ग्रामीण आणि निमशहरी भागात गॅस सिलिंडरला इथेनॉलवर चालणाऱ्या शेगड्यांचा सक्षम पर्याय उपलब्ध होऊ शकतो. इथेनॉलवर आधारित स्वयंपाकाच्या शेगड्या विकसित करण्यासाठी एलपीजी इक्विपमेंट रिसर्च सेंटर आणि विविध आयआयटी संस्थांमध्ये संशोधन सुरू असल्याची माहिती 'एफआयपीआय'चे संचालकांनी दिली. हे तंत्रज्ञान सर्वदूर पोहोचवण्यासाठी केवळ निर्मिती पुरेशी नसून, इथेनॉल थेट घरांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक मजबूत पुरवठा साखळी विकसित करणे हे आव्हान असल्याचे दिसून येत आहे.त्याच प्रमाणे भारताकडे सध्या २० हजार कोटी लिटर्स इथेनॉलची क्षमता तयार आहे. पण, आपली गरज केवळ ११ बिलियन लिटर्स एवढीच आहे. म्हणजेच गरजेपेक्षा अधिक प्रमाणात इथेनॉल निर्मिती केली जात आहे. अर्थशास्त्राच्या नियमानुसार गरजेपेक्षा अधिक निर्मिती झाल्याने त्याचे भाव पडले आहेत. ऊसाच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती करणाऱ्यांपेक्षा भात, मका यापासून इथेनॉल निर्मितीचे प्लांट अधिक वाढले, सरकारने देखील त्यांना प्राधान्य दिले. यामुळे पारंपरिक पद्धतीने उत्पादन करणारे मागे पडले. इथेनॉल निर्मिती आणि साठा वाढला पण, त्या तुलनेत मागणी वाढली नाही, म्हणजेच दर कमी झाले. इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळल्यास जून्या गाडया आहेत त्यांच्यावर संकट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सरकारला चोहोबाजून विचार करून वाटचाल करावी लागेल. काही झाले तरी गॅस वापरताना बचत करणे हा सर्वोत्तम पर्याय आहे तो स्विकारावा लागणार आहे.

# इंग्रजी भाषा ही जागतिक ज्ञानाची गुरुकिल्ली - डॉ. रामप्रसाद लखोटिया




**उदगीर/प्रतिनिधी :** आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जगाशी प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी इंग्रजी हीच प्रमुख भाषा असून तीच जागतिक ज्ञानाची गुरुकिल्ली बनली आहे, असे मत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र उदयगिरी

महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्ष व एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रामप्रसाद लखोटिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार उपस्थित होते. व्यासपीठावर इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजीव सूर्यवंशी, प्रा. राजा मुदूडगे, प्रा. प्रविण अंबेसंगे, प्रा. व्ही. डी. काकनाळे, प्रा. ए. सी. बिरादार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. संजीव सूर्यवंशी यांनी करून दिला तसेच इंग्रजी विभागामार्फत 'कम्युनिकेशन अँड स्पोकन इंग्लिश' या उपक्रमांतर्गत नियमित वर्ग तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपल्या भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करावी, अशी माहिती सांगितली. यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार म्हणाले, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि जागतिक स्तरावर प्रगती साधण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान अत्यंत आवशयक आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्र्वासाने इंग्रजी आत्मसात करून उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा. यावेळी लिटररी असोसिएशनच्या वतीने भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बी.ए. द्वितीय वर्षातील कु. ऋतुजा कप्ते व कु. आसावरी अपसिंगेकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. क्षीरस-ागर अभिजीत व विशाल कांबळे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात डॉ. लखोटिया यांनी विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच इंग्रजी भाषेवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षात सातत्याने परिश्रम घेऊन या भाषेवर प्रभुत्व मिळविल्यास शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात यश मिळविणे अधिक सुलभ हो-ते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजयालक्ष्मी प्रसन्ने यांनी केले, तर आभार प्रा. शिवनंदा रोडगे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. प्रवीण अंबेसंगे, प्रा. बालाजीप्रसाद घाळे, प्रा. विजयालक्ष्मी प्रसन्ने, प्रा. शिवनंदा रोडगे, प्रा. शादूल शेख यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# डिजिटल परिवर्तनामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणत डिजिटल परिवर्तनाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे विभागाच्या कामकाजात पारदर्शकता, वेग आणि उत्तरदायित्व वाढले असून नागरिकांना थेट आणि जलद सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, या कालावधीत ९९ टक्के तक्रारींचे यशस्वी निराकरण करण्यात विभागाला यश आले असून, हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे द्योतक मानले जात आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवस ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत १८६.७५ गुण मिळवित सर्वोत्तम मंत्रालयीन विभागात राज्यात प्रथम स्थान पटकाविले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर आणि विद्यमान अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

विभागाच्या या व्यापक परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरलेला घटक म्हणजे विभागाचे अद्ययावत आणि नागरिकाभिमुख संकेतस्थळ. १९९५ साली सुरू झालेले संकेतस्थळ आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पूर्णपणे नव्याने विकसित करण्यात आले आहे. एस३डब्ल्यूएएस (सिक्युअर स्केलेबल अँड सुगम्य वेबसाईट अँज अ सर्विह्स) या प्रणालीवर आधारित हे संकेतस्थळ अधिक सुरक्षित, वापरण्यास सुलभ आणि सर्वसम ावेशक आहे. संकेतस्थळावर डब्ल्यूसीएजी २.२ आयएए प्रमाणित सुलभता साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. याम ध्ये अक्षरांचा आकार बदलणे, उच्च कॉन्ट्रास्ट मोड, टेक्स्ट-टू-स्पीच सुविधा, आवाजावर आधारित शोध आणि बहुभाषिक भाषांतर यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील नागरिकांनाही सहजपणे माहिती मिळू लागली आहे.

संकेतस्थळाच्या वापरात झालेली वाढ ही या बदलाची साक्ष देते. संकेतस्थळ सुरू झाल्यापासून लाखो नागरिकांनी त्याचा वापर केला असून, पहिल्या ३० दिवसातच दहा लाखांहून अधिक सक्रिय वापरकर्ते नोंदवले गेले आहेत. सरासरी सहा मिनिटांपेक्षा जास्त कालावधी वापरकर्ते संकेतस्थळावर घालवत असल्याने माहितीची उपयुक्तता आणि सुलभता स्पष्ट होते. तसेच, 'बाउन्स रेट' कमी असल्याने वापरकर्ते दीर्घकाळ संकेतस्थळावर टिकून राहत असल्याचे दिसून येते.

'आपले सरकार' पोर्टलशी एकत्रीकरण हा विभागाच्या कामकाजातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित केलेल्या आठही सेवा पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आल्या असून, नागरिकांना आता अर्ज, मंजुरी, प्रमाणपत्रे यासाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता उरलेली नाही. या प्रक्रियेमुळे सेवा वितरणाचा कालावधी लक्षणीयरित्या कमी झाला आहे. पूर्वी सरासरी ३२ दिवस लागणारी प्रक्रिया आता केवळ २० दिवसांत पूर्ण होत आहे. याचबरोबर सेवास्तर पालनातही मोठी सुधारणा झाली असून ते ९० टक्क्यांवरून १३८ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

तक्रार निवारण प्रणालीत झालेली सुधारणा ही या मोहिमेची सर्वात मोठी यशोगाथा ठरते. दैनंदिन देखरेख, संरचित आढावे आणि वेळेवर तक्रारींचे निवारण यामुळे तक्रार निवारणाचे प्रमाण ८० टक्क्यांवरून ९९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. एस्कलेशनचे प्रमाण १२ टक्क्यांवरून केवळ ०.०९ टक्क्यांपर्यंत घटले आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. सार्वजनिक विभागाने १,२४८ तक्रारींचे विषण करून त्यातील सुम ारे ३९.५ टक्के तक्रारी रस्त्यांच्या देखभाल आणि गुणवत्तेशी संबंधित असल्याचे ओळखले. या विषणाच्या आधारे आवश्यक उपाययोजना राबविण्यात आल्या असून, विशेषत: पावसाळ्यात उद्भवणाऱ्या सम स्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

बांधकाम विभागाच्या अंतर्गत काम काजातही डिजिटल प्रणालींचा मोठ्या प्रम ाणावर वापर सुरू झाला आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे सर्व अधिकारी डिजिटल पद्धतीने काम करत असून, फाईल हालचालीचे रिअल-टाइम निरीक्षण शक्य झाले आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेला गती मिळाली असून विलंबात लक्षणीय घट झाली आहे. गव्हर्नमेंट प्रोसेस रि-इंजीनियरिंग (जीपीआर) च्या माध्यमातून ६४३ प्रक्रियांचे विषण करून कार्यपद्धती अधिक सुलभ करण्यात आली आहे. फाईल प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या कमी करून कामकाज अधिक परिणामकारक करण्यात आले आहे.

डॅशबोर्ड आणि डेटा ॲनालिटिक्स प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. सर्व लोकसेवा हक्क अधिनियमातील सेवा एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध करून देण्यात आल्या असून, त्याद्वारे सेवा वितरणाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि भविष्यातील अंदाज बांधणे शक्य झाले आहे. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख अधिक सक्षम झाली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले आहे.

नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी व्हॉटसअप आणि चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. पीडब्ल्यूडी चॅटबॉटद्वारे नागरिकांना सेवा, अर्ज प्रक्रिया, तक्रार निवारण याबाबत मार्गदर्शन मिळते. तसेच, व्हॉटसअप ब्रॉडकास्टिंगद्वारे हजारो नागरिकांना सेवांबाबत माहिती देण्यात आली आहे. या माध्यमातून नागरिकांचा सहभाग वाढून प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले आहे.

तंत्रज्ञानाच्या वापरात विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेचाही प्रभावी अवलंब केला आहे. 'पॉथ्होलगार्ड' या एआय-आधारित प्रणालीद्वारे रस्त्यांवरील खड्ड्यांची ओळख करून त्यांची तातडीने दुरुस्ती केली जाते. उड्ए तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खड्ड्यांचे अचूक स्थान नोंदवले जाते आणि दुरुस्ती झाल्यानंतर त्याची पडताळणीही केली जाते. यामुळे रस्त्यांची गुणवत्ता सुधारून अपघातांची शक्यता कमी झाली आहे.

याशिवाय, विभागाने जेनएआय प्लॅटफॉर्मचा वापर करून धोरणनिर्मिती आणि विषणातही नवोन्मेष केला आहे. ड्रोन धोरण, रस्ता आखणी आणि पायाभूत प्रकल्पांसाठी निधी उभारणी यासारख्या विषयांवर एआयच्या मदतीने अभ्यास करण्यात आला आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेत अधिक अचूकता आणि वेग आला आहे.

जीआयएस आणि 'पीएम गती शक्ती' पोर्टलच्या माध्यमातून प्रकल्प नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने केले जात आहे. नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग प्रकल्पात विविध स्तरांवरील माहितीचा वापर करून जंगल क्षेत्र, वन्यजीव मार्ग आणि खनिज क्षेत्र यांचे अचूक विषण करण्यात आले. परिणामी, सुमारे २७ हेक्टर जंगल वाचवण्यात यश आले आहे, जे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले आहे.

वृक्षलागवड उपक्रमातही विभागाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. 'ट्री ॲप'च्या माध्यमातून ८ लाखांहून अधिक झाडांची नोंद आणि देखरेख करण्यात आली आहे. जीपीएस आणि छायाचित्रांच्या साहाय्याने झाडांची स्थिती तपासली जाते आणि त्यांच्या वाढीवर लक्ष ठेवले जाते. यामुळे पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळाली आहे.

या सर्व उपक्रमांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ प्रशासनिक कार्यक्षमता वाढवली नाही, तर नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जाही उंचावला आहे. या डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांचा शासनावरचा विश्वास अधिक दृढ झाला असून, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाची पायाभरणी झाली आहे.

एकूणच, १५० दिवस ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील इतर विभागांसाठी आदर्श निर्माण केला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

''सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या १५० दिवसांत राबविलेल्या ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमांमुळे प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि दर्जेदार सेवा देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असून, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. तक्रार निवारणात ९९ टक्के यश, सेवा वितरणातील वेग आणि डिजिटल प्रणालींचा व्यापक वापर यामुळे नागरिकांचा शासनावर विश्वास अधिक दृढ झाला आहे. पुढील काळातही 'नागरिक प्रथम' या तत्त्वावर काम करत विभागाला अधिक सक्षम आणि लोकाभिमुख बनविण्याचा आमचा प्रयत्न राहील.'' - शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

''या १५० दिवस ई गव्हर्नन्स उपक्रमात आम्ही केवळ तांत्रिक बदल केले नाहीत, तर कार्यपद्धतीतही मूलभूत सुधारणा केल्या आहेत. ई ऑफिस, आपले सरकार पोर्टल, एआय-आधारित प्रणाली आणि डेटा ॲनालिटिक्स यांचा समन्वय साधत सेवा वितरण अधिक कार्यक्षम करण्यात आले आहे. दैनंदिन देखरेख, संरचित आढावे आणि प्रक्रियेचे सुलभीकरण यामुळे निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे. या उपक्रमांमुळे प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि परिणाम कारक झाले असून, नागरिकांना त्याचा थेट लाभ होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स उपक्रमातून सार्वजनिक बांधकाम विभागाने डिजिटल परिवर्तन प्रभावीपणे राबवले आहे.''

**- मनिषा म्हैसकर,**
**तत्कालीन अपर मुख्य सचिव,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

# पाऊसथेंब



सोडूनी ढगांतील 'सुखाचं घर',
ओढ मातीच्या भेटीची जागली,
धरूनी वाऱ्याचा 'हात अलगद',
थेंबाची आस धरेवर सांडली.

मिसळता मातीत थेंब तो,
'मृदगंधाचा' सोहळा झाला,
स्वत्वाचे तो समर्पण देऊनी
'मातीत मोती' होऊन उरला.

थेंबाचे समर्पण आकाशाच्या अथांग विस्तारात, सावळ्या ढगांच्या कुशीत पाऊसथेंबाचे एक सुरक्षित आणि 'सुखाचे घर' असते. पाऊसथेंब तेथे रहातो सुखाने. एक दिवस निसर्गाची ओढ आणि धरणीमातेची तहान त्याला स्वस्थ बसू देत नाही. मातीच्या भेटीची ओढ त्याच्या मनात जागी होते, तेव्हा तो आपल्या सुखाच्या घराचा त्याग करण्याचा धाडसी निर्णय घेतो.

मातृत्वाचा, वात्सल्याचा हात सोडणे हा प्रवास सोपा नसतो. उंचावरून खाली झेपावताना तो वाऱ्याचा 'हात अलगद' धरतो. वाऱ्याच्या लहरीवर स्वार होऊन, स्वतःचे अस्तित्व पणाला लावून तो धरेच्या दिशेने प्रवाहित होतो. या प्रवासात भीती नसते, तर असते ती केवळ भेटीची आस. जेव्हा हा इवलासा थेंब मातीला स्पर्श करतो, तेव्हा निसर्गात एक चमत्कार घडतो. माती आणि पाण्याचा तो संगम म्हणजे केवळ ओलावा नसून, तो 'मृदगंधाचा' एक अपूर्व सोहळा असतो. तो सुवास सांगतो की, एक थेंब आता मातीचा झाला आहे.

या कवितेतील सर्वात सुंदर विचार म्हणजे 'स्वत्वाचे समर्पण'. तो थेंब मातीत मिसळताना स्वतःची ओळख पुसून टाकतो. पण हे पुसले जाणे म्हणजे संपणे नव्हे, तर ते 'मातीत मोती' होऊन उरणे आहे. हे मोती म्हणजे मातीतून उगवणारे सोनेरी धान्य आणि धरणीवर पसरलेली हिरवळ.

माणसाचे जीवनही अशाच समर्पणाने समृद्ध होते. जेव्हा आपण आपल्या स्वार्थाचे 'सुखाचे घर' सोडून दुसऱ्याच्या आयुष्यात आनंद पेरण्यासाठी स्वतःला समर्पित करतो, तेव्हाच आपल्या जीवनाचा खऱ्या अर्थाने 'मृदगंध' होतो. हा पाऊसथेंब आपल्याला हेच शिकवतो की, स्वतःला विसरून दुसऱ्यात मिसळण्यातच आयुष्याचे खरे सार्थक आहे.

**-राहूल हरीभाऊ इंगळे पाटील**

०००००००००००००००००००००

## मानसिक आरोग्याकडे सर्वांगीण दृष्टीकोन

मानसिक आरोग्याबाबत आज समाजात जागरूकता वाढत असली तरी केवळ आजारावर उपचार करण्यापेक्षा मानसिक स्वास्थ्य जपणे अधिक महत्त्वाचे ठरत आहे. यासाठी समग्र दृष्टीकोन अत्यंत उपयुक्त मानला जातो. या दृष्टीकोनानुसार व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे फक्त मनाशी संबंधित नसून शरीर, भावना, सामाजिक संबंध आणि जीवनशैली या सर्व घटकांवर अवलंबून असते. प्रथम, शारीरिक स्वास्थ्य हे मानसिक स्वास्थ्याचे आधारस्तंभ आहे. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि व्यसनांपासून दूर राहणे यामुळे मन ताजेतवाने राहते. शरीर निरोगी असेल तर तणाव सहन करण्याची क्षमता वाढते. दुसरे म्हणजे भावनिक व मानसिक संतुलन. सकारात्मक विचार, ध्यान-धारणा, तणाव व्यवस्थापन आणि आपल्या भावना व्यक्त करण्याची सवय या गोष्टी मन स्थिर ठेवतात. आवश्यकतेनुसार समुपदेशन घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तिसरे, सामाजिक नातेसंबंध. कुटुंब, मित्र आणि समाजाशी असलेले सुदृढ संबंध व्यक्तीला भावनिक आधार देतात. एकटेपणा आणि तुटलेपण टाळण्यासाठी संवाद आणि सहकार्य आवश्यक आहे. चौथे, आध्यात्मिक व जीवनमूल्ये. ध्यान, योग, निसर्गसंग, कृतज्ञता आणि जीवनातील उद्दिष्टांची जाणीव यामुळे अंतः शांती मिळते आणि जीवनाला दिशा मिळते. समग्र दृष्टीकोनाचा मुख्य हेतू म्हणजे केवळ आजार टाळणे नव्हे, तर संतुलित, आनंदी आणि अर्थपूर्ण जीवन जगणे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात या सर्व घटकांचा समावेश केल्यास मानसिक स्वास्थ्य अधिक बळकट होऊ शकते. आजच्या धकाधकीच्या जीवनात हा दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

**लेखक - ॲड प्रज्वल संतोष सुरवसे**

०००००००००००००००००००००

## कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी वरदानापेक्षा कमी नाही 'हे' फळ

उन्हाळा सुरू होताच शरीराला थंडावा देणाऱ्या फळांची मागणी वाढते. आंबा, टरबूज आणि खरबूजासोबतच दक्षिण भारत आणि किनारपट्टीच्या प्रदेशात खूप लोकप्रिय असलेले आणखी एक विशेष फळ म्हणजे ताडगोळा. ज्याला आइस ॲपल म्हणून देखील ओळखलं जातं. उन्हाळा सुरु होताच या फळाची मागणी वाढते. हे फळ ताडवृक्षापासून मिळते आणि त्याचा पारदर्शक, जेलीसारखा गर त्याला खूप आकर्षक बनवतो. ताडगोळा चवीला किंचित गोड आणि रस्सेदार असतो. उन्हाळ्याच्या दिवसात ते खाल्ल्याने शरीराला त्वरीत थंडावा मिळतो. तसंच त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते शरीर हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते. आईस ॲपल पौष्टिकतेच्या दृष्टीनेही फायदेशीर आहे. त्यामध्ये जीवनसत्त्वे ए, बी आणि सी तसंच पोटॅशियम आणि लोहासारखी खनिजे आढळतात. हे घटक ऊर्जा टिकवून ठेवण्यास, त्वचा निरोगी ठेवण्यास तसंच रोगप्रतिकाशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. शिवाय त्यातील फायबरचे प्रमाण पचनसंस्था निरोगी ठेवण्यासही मदत करते. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनने प्रकाशित केलेल्या एक अभ्यासानुसारआईस ॲपलचा अर्क मानवी पेरिओडोंटल लिगामेंट फायब्रोब्लास्ट्स कार्यक्षमता टिकवण्या मदत करते. उन्हाळ्यासाठी खास: उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे शरीर अनेकदा निर्जलीकरण झाल्यासारखे आणि थकल्यासारखं वाटते. ताडफळासारखी रसरशीत फळे ही समस्या कमी करण्यास मदत करू शकतात. ताळगोळा शरीराला थंडावा देतो तसंच उष्णतेमुळे होणारा त्रास कमी करते.

**आईस ॲपल खाण्याचे फायदे**

नैसर्गिक थंडावा: हे फळ रसदार आणि नैसर्गिकरित्या थंड असते. जे शरीराला आतून शांत करते आणि उष्माघात दूर ठेवते. हायड्रेशन: यात ८५-९० टक्के पाणी असल्यामुळे ते शरीराला हायड्रेट ठेवते. ज्यामुळे ताळगोळा नैसर्गिकरित्या ताजेतवाने करणारे फळ ठरते. तसंच हे उष्ण हवामानात शरीरातील कमी झालेल्या द्रवांची भरपाई करण्यास मदत करते. आईस ॲपलमध्ये पोटॅशियम आणि सोडियमसारखी महत्त्वाची खनिजे असतात. जी शरीरातील द्रवांचे संतुलन राखण्यास मदत करते. त्याचा थंड स्वभाव शरीरातील अंतर्गत उष्णता शांत करते आणि शरीरातील तापमान नियंत्रित ठेवते. इलेक्ट्रोलाइट्सने समृद्धः ताडगोळ्यामध्ये अशी खनिजे भरपूर प्रमाणात आढळतात जी आपल्या शरीरातील द्रवांचे संतुलन राखण्यास मदत करतात. तसंच यातील पोटॅशियम हृदयासाठी, मज्जातंतूचे कार्य सुधारण्यासाठी आणि द्रवांचे संतुलन नियंत्रित करण्यास मदत करते. तसंच हे स्नायूंचे पेटके टाळते. त्याचबरोबर यात सोडियम, कॅल्शियम, आणि मॅग्नशियम देखील भरपूर प्रमाणत असतात. जे शरीरातील पाणी टिकवून ठेवण्यास, रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि स्नायू आणि मज्जातंतूच्या कार्याला आधार देण्यास मदत करतात.

# देश माओवाद मुक्त

आदिवासी भागात खाणकाम अथवा खनिज उत्खनन करणे म्हणजे आदिवासींच्या विकासाचा मूलमंत्र, या पद्धतीची भ्रामक कल्पना प्रशासनाने ठेवू नये. त्यांच्या निसर्गकेंद्रित जगण्यावर आक्रमण न करता विकासाची फळे त्यांच्यापर्यंत पोहोचवावी लागतील.

भारत माओवादमुक्त झाल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतीच संसदेत केली. देशांतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने ही दिलासा देणारी बाब ठरावी. माओवाद्यांच्या कारवाया आता इतिहास बनावा, हीच सर्वसामान्य भारतीयांची अपेक्षा आहे. महाराष्ट्रासह देशातील अकराहून अधिक राज्यांमध्ये नक्षलवादी चळवळीचा विस्तार होता. या पार्श्वभूमीवर देश माओवाद मुक्त करण्याचे उद्दिष्ट जेव्हा जाहीर झाले तेव्हा त्याकडे साशंकतेने पाहिले जाणे स्वाभाविक होते. बंदुकीच्या बळावर समस्यांचे निराकरण करण्याची भूमिका भारतीय घटनेविरोधी आहे, ही ठाम भूमिका केंद्रीय गृह मंत्रालयाने घेतली. नक्षलवाद्यांना शरण येण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती. काल ही मुदत



कृती बदलली. यातून दंडकारण्यासारख्या निबिड प्रदेशात रक्ताचे पाट वाहू लागले. यात आदिवासींची दुहेरी कोंडी झाली. केंद्र आणि राज्य यांची प्रशासन व्यवस्था विरुद्ध नक्षलवाद्यांच्या टोळ्या, यामध्ये त्यांच्या जीवनातील निराशेचे पर्व आणखी गडद झाले.

'विकास' कोठे गेला?

सन २००० नंतरचा नक्षलवादी दहशतवाद विचारात घेतला तर यात बारा हजारापेक्षा अधिक बळी गेले आहेत. त्यात सामान्य खेडूत, सुरक्षा दलाचे जवान, प्रशासकीय अधिकारी अशा सर्व घटकांचा समावेश आहे. भारतीय प्रशासन किडलेले आहे. लाचखोर अधिकारी आणि कर्मचारी यांचे उद्योग दररोज पुढे येत असतात. याच भ्रष्ट मानसिकतेने केंद्र आणि राज्य शासनाच्या विकास योजना आदिवासी बहुल भागापर्यंत पोहोचू दिल्या नाहीत. सत्तेवरील व्यक्तींची अर्थातच त्यांना साथ होती! एकप्रकारे आपल्याच सरकारविरुद्ध या घटकांना उभे करण्याचे काम प्रशासनातील गलिच्छ मानसिकतेने वर्षानुवर्षे केले. याची मोठी किंमत देशाला चुकवावी लागली

संपत असताना बस्तरमध्ये काही नक्षलवादी शरण आले. तेलंगणमधील देवजी, चंद्राण्णा, महाराष्ट्रातील सोनू ऊर्फ भूपती, मध्य प्रदेशातील कबीर, आंध्र प्रदेशातील देवा, असे माओवाद्यांचे अनेक म्होरके आपापल्या साथीदारांसह यापूर्वी शरण आले आहेत. माओवादी चळवळीला भलेही बाहेरून साहाय्य मिळत असेल, पण चळवळीला बळ मिळाले ते येथील विषमतेमुळे! स्वातंत्र्यानंतर देखील हजारो आदिवासी पाड्यांवरील अंधार संपला नव्हता. आदिवासींच्या श्रमाची चोरी होत होती आणि सावकारी फास मजबूत बनला होता. अशावेळी नक्षलवाद्यांनी आदिवासी समूहांची सहानुभूती मिळवून 'लाल साम्राज्य' उभे केले. पण ज्यांच्याकडे ताकद आणि शस्त्रे असतात ते व्यवस्थेचा भाग कधी बनून जातात हे समजतही नाही. मग ज्या विचारप्रणालीचा उदोउदो त्यांच्याकडून केला जातो ती गुंडाळून ठेवली जाते, केवळ तोंडदेखला उच्चार करून शोषणाच्या प्रक्रियेला तत्त्वांचा मुलामा दिला जातो. नक्षलवाद्यांच्या बाबतीत तेच झाले. दुर्बल घटकांचे शोषण करणाऱ्यांकडे त्यांच्या बंदुकीची नळी होती, तीच आर्थिक सुबत्तेचे साधन ठरू शकते, हे समजल्यावर त्यांची

आहे. आज विकासाचा डांगोरा पिटला जातो, पण मेळघाटासारख्या भागात कुपोषणाचा प्रश्न सुटला आहे का? मेळघाट काय, पुण्यासारख्या प्रगत जिल्ह्यात देखील दुर्गम भागात अनेक ठिकाणी रस्ते नाहीत. जुन्नर आणि आंबेगाव या तालुक्यांच्या सीमेवरील खेतपठार या गावातील मुलाला रस्ता नसल्याने रुग्णालयापर्यंत वेळेत पोहोचविता आले नाही आणि त्याचा मृत्यू झाला. विकास सर्वदूर पोहोचविण्याचे आव्हान पेलण्याची इच्छाशक्ती सरकारकडे आहे का? हा कळीचा मुद्दा होय. विकास नाही, याच मुद्द्यावर नक्षलवाद्यांनी देशातील मोठ्या घटकाची दिशाभूल केली, हे वस्तुस्थिती विसरून चालणार नाही. विकास आणि शोषणमुक्त समाज, यापासून आपण दूर राहिलो तर नक्षलवादी, माओवादी शक्तींचा पुन्हा जन्म होणार नाही, हे छातीठोकपणे सांगता येईल का? ते होऊ द्यायचे नसेल तर माओवादमुक्त भारताचा जसा निर्धार केला गेला आणि त्यासाठी पावले उचलली गेली तसाच निर्धार दाखवावा लागेल. हा प्रश्न देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे. यामुळे श्रेयवादाचे राजकारण सुद्धा कटाक्षाने टाळले पाहिजे.



# स्टील, तांबे की काच? कोणती बाटली सर्वात सुरक्षित आहे?

निरोगी जीवनशैलीसाठी पुरेसे पाणी पिणे पुरेसे नाही; तुम्ही वापरत असलेले भांडे किंवा बाटली देखील महत्त्वाची आहे. तज्ञांच्या मते, पाण्याच्या बाटलीच्या निवडीचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होऊ शकतो. आजकाल, वाढत्या आरोग्यविषयक जागरूकतेमुळे, लोक प्लास्टिकच्या बाटल्या सोडून तांबे, स्टेनलेस स्टील आणि काचेच्या पर्यायांकडे वळत आहेत. हे सर्व पर्याय सुरक्षित मानले जात असले तरी, त्यांचे गुणधर्म आणि फायदे लक्षणीयरीत्या भिन्न आहेत.

उन्हाळ्यात तोंडातील छाल्यांवर स्वयंपाकघरातील ही एक वस्तू आराम देईल

तांब्याची बाटली

भारतीय संस्कृती आणि आयुर्वेदात शतकानुशतके तांब्याच्या भांड्यांचा वापर केला जात आहे. तांब्यामध्ये नैसर्गिक सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्म आहेत, जे पाण्यात वाढणाऱ्या हानिकारक जीवाणूंना प्रभावीपणे नष्ट करतात. वैज्ञानिक संशोधनातून हे देखील सिद्ध झाले आहे की, जेव्हा पाणी तांब्याच्या बाटलीत काही तासांसाठी साठवले जाते, तेव्हा ते तांब्यामधील सूक्ष्म घटक शोषून घेते.

लातूर: ७५ साल की महिला ने बताया मधुमेह को हराने का घरेलु उपाय

और जानें

हे तांब्याने समृद्ध असलेले पाणी शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते. तसेच ते पचनक्रिया जलद करते आणि थायरॉईड-संबंधित समस्यांपासून आराम देऊ शकते. तांब्याचे सूक्ष्म घटक शरीरातील आवश्यक एन्झाइम्सचे उत्पादन वाढवतात, जे अन्न जलद आणि योग्यरित्या पचण्यास मदत करतात.

ङडज ठएऊ उष्माघाताच्या वेळी हे फळ खाल्ल्याने लवकर बरे होण्यास मदत होते आणि आराम मिळतो

स्टेनलेस स्टील

आजच्या वेगवान जीवनात स्टेनलेस स्टीलच्या बाटल्या एक लोकप्रिय पर्याय बनल्या आहेत. या बाटल्या केवळ टिकाऊ आणि सुरक्षितच नाहीत, तर स्वच्छ करायलाही सोप्या आहेत. स्टीलच्या बाटल्यांचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, त्यांमध्ये कोणतेही हानिकारक रसायने किंवा दुर्गंधी नसते. शिवाय, व्हॅक्यूम-इन्सुलेटेड स्टीलच्या बाटल्या दीर्घकाळ पाणी थंड किंवा गरम ठेवू शकतात, ज्यामुळे त्या प्रवासासाठी आणि ऑफिससाठी आदर्श ठरतात.

ब्रेन स्ट्रोक चे कारण, लक्षण आणि उपाय जाणून घ्या

काचेची बाटली

ज्यांना कोणत्याही रसायनांपासून किंवा धातूच्या चवीपासून पूर्णपणे दूर राहायचे आहे, त्यांच्यासाठी काचेच्या बाटल्या हा एक उत्तम आणि सुरक्षित पर्याय आहे. काच पूर्णपणे रसायनमुक्त असते, त्यामुळे मिनरल वॉटर साठवण्यासाठी हे सर्वात सुरक्षित भांडे ठरते. तथापि, काचेच्या बाटल्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे त्यांचा टिकाऊपणा; त्या रोजच्या जास्त वापरासाठी तितक्याशा योग्य नसतात आणि त्यांना काळजीपूर्वक हाताळण्याची आवश्यकता असते.

देखभाल आणि स्वच्छता

कोणत्याही भांड्याचे फायदे ते योग्य काळजीने स्वच्छ केल्यावरच मिळतात. तांब्याच्या बाटलीची देखभाल करण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तांब्याची चमक आणि गुणधर्म टिकवून ठेवण्यासाठी ते लिंबू, मीठ किंवा व्हिनेगरच्या द्रावणाने नियमितपणे स्वच्छ केले पाहिजे.बाटली स्वच्छ केल्यानंतर ती पूर्णपणे कोरडी करणे आवश्यक आहे. याउलट, स्टीलच्या बाटल्या साध्या साबण आणि पाण्याने सहज स्वच्छ करता येतात आणि त्या दीर्घकाळ टिकतात. जर तुम्ही औषधी गुणधर्मांसाठी बाटली शोधत असाल, तर तांबे सर्वोत्तम आहे, परंतु सोय आणि टिकाऊपणासाठी स्टेनलेस स्टील हा एक अतुलनीय पर्याय आहे.

अस्वीकरण : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता

# पेट्रोलवर खर्च केलेले दोन हजार नेमके कोठे जातात?

इराणमधील युद्ध, सरकारी कर आणि ग्राहकांच्या खिशावर होणारा परिणाम...

राज नावाच्या तरूणाने आपली मोटार पेट्रोल पंपावर उभी केली. दोन हजार रुपयांचे पेट्रोल भरा, असे सांगून तो गाडीला टेकून उभा राहिला. डिजिटल मीटरवर अंक वेगाने फिरत होते. २१.१ लीटर पेट्रोल भरून झाले, राज याने पैसे दिले आणि तो निघाला; पण त्याच्या मनात एक विचार कायम राहिला, तो म्हणजे मी मोजलेल्या दोन हजार रुपयांमधील पेट्रोलचे पैसे आणि सरकारचा कर नेमका किती? त्यावर टाकलेला धावता दृष्टीक्षेप...

पेट्रोलच्या किमतीची फोड

जेव्हा तुम्ही पेट्रोल पंपावर जाऊन पेट्रोल भरता, तेव्हा तुम्ही दिलेल्या पैशांचा प्रत्येक रुपया फक्त पेट्रोलसाठी नसतो. त्यामध्ये खनिज तेलाचा आयात आणि शुद्धीकरण खर्च, वाहतूक, पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्क, राज्य सरकारचा कर, वितरकाचे कमिशन आणि पेट्रोल पंप चालकांचा नफा यांचा समावेश असतो. इराण युद्ध आणि बदललेले गणित सध्या पश्चिम आशियातील विशेषतः इराण युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत खनिज तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. अशा परिस्थितीत सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने विशेष उत्पादन शुल्कात प्रति लीटर १० रुपयांची कपात केली आहे. या कपातीमुळे पेट्रोलवरील विशेष उत्पादन शुल्क आता ३ रुपये, तर डिझेलवर शून्य झाले आहे.

# हनुमान जयंती

हनुमान जयंती हा चैत्र पौर्णिमेला साजरा होणारा हिंदू सण असून, भगवान हनुमानाचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. शक्ती, भक्ती आणि बुद्धीचे प्रतीक असलेल्या हनुमानाची या दिवशी विशेष पूजा, हनुमान चालीसा पठण आणि मारुती स्तोत्र वाचन केले जाते. हा दिवस नकारात्मक ऊर्जा नष्ट करून सुख, शांती आणि यश मिळवून देणारा मानला जातो .

जन्माची कथा: पौराणिक मान्यतेनुसार, चैत्र पौर्णिमेला माता अंजनी आणि केसरी यांच्या पोटी हनुमानाचा जन्म झाला. हनुमान हे पवनपुत्र आणि भगवान शिवाचा ११ वा रुद्रावतार मानले जातात .



महत्त्व: हनुमान हे रामभक्त म्हणून ओळखले जातात. त्यांच्या जीवनातून नम्रता, निष्ठा आणि संकटांशी लढण्याचे बळ मिळते. या दिवशी मारुतीरायाला शेंदूर आणि रुईची पाने वाहण्याची परंपरा आहे

साजरे करणे: या दिवशी पहाटेपासूनच मंदिरात गर्दी असते. हनुमान मंदिरात अभिषेक केला जातो. अनेक ठिकाणी भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

विद्या आणि शक्तीचे प्रतीक: हनुमान हे अष्टसिद्धी आणि नवनिधीचे दाता आहेत. त्यांच्या उपासनेने भीती दूर होते आणि आत्मविश्वास वाढतो. हनुमान जयंती आपल्याला शक्तीचा वापर केवळ चांगल्या कामासाठी आणि भक्तीमार्गावर चालण्यासाठी करण्याचा संदेश देते.

जय श्रीराम! जय बजरंगबली!

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



जांभूळ सरबत अगदी नैसर्गिक असल्यामुळे चवदार लागते. तुम्ही आईसक्रीम मध्येही घालू शकता.

जांभूळ हे उत्तम फळ आहे सुश्रुतांच्या मते जांभूळ पित्त, रक्तदहनाशक, शरीराची कांती सुंदर बनवणारे आहे.

जांभूळ खाल्ल्याने रक्त लाल बनते. जांभळे मीठ टाकून खाणे हितावह आहे जांभळा मध्ये लोह फॉस्फरस, फॉलिक एसिड असते. जांभळे किडकी खाऊ नयेत.

जांभूळ पिकण्यासाठी ग्रीष्माचे ऊन आणि वर्षाऋतूतील पावसाचा शिडकावा लागतो. बुद्ध लोक या झाडाला पवित्र मानतात.

## २ Joke विनोद




**स्पर्धा :**

न्यायालयाजवळील टायपिंगच्या दुकानावर पाटी होती, 'कागदपत्रे टाईप केली जातात, तीन भाषेत.'

काही दिवसांनी त्याच्याजवळ दुसरे दुकान निघाले. तिथे पाटी होती, 'झेरॉक्स प्रती मिळतील कोणत्याही भाषेत.'

## ३ Message संदेश



Santa badi der se apne room me kuch dhoond rha tha,
pareshan hokar uski biwi Jeeto boli Jeeto – Kya dhoond rahe ho?
Santa – Hidden Camera
Jeeto – Tumhe Kaise pata is room me hidden camera hai?
Santa – Agar hidden camera nahi hota to T.V. wale is aadmi ko kaise pata hota ki hum star plus dekh rahe hain, bar bar ye -"aap dekh rahe hain star plus" bol raha hai.

## ४ Thought सुविचार



जगातील सर्व प्रतिभासंपन्न माणसे ईश्वराच्या समीप असतात.
– स्टीव्हनसन

**संस्कृत सुभाषित**

**स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।**
**सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम।।**

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. पुरोगामी, आधुनिक विचारांचा
४. हिरव्या रंगाचा कीटक
७. साडेसातीचा अडीच वर्षांचा दुसरा टप्पा
९. काचेवरील ओरखडा
१०. नित्यनेमाने केलेले वाचन
११. 'जगी हा खास वेड्यांचा --- माजला सारा' (रणदुंदुभी नाटकातील मा.दीनानाथ यांचे गाजलेले पद)
१२. अडथळा, पाचर
१३. आमदार-खासदारांनी घातलेल्या गोंधळासाठी रूढ झालेला शब्द
१५. गंगाजल
१७. कैकेयीची दासी
१८. हिंदीत पैंजण
२०. पहारा, रक्षण
२१. अंतर्गत
२२. साद
२४. अनामिकेशेजारील बोट
२४अ. धमनी, नाडी
२५. बांबू
२७. आठवड्यातील दिवस
२८. तोल सांभाळण्याची कामगिरी
३०. पथारी
३३. नाहक, विनाकारण
३५. कार्तिकेयाच्या मुखांची संख्या
३६. शाहीराजवळचे वाद्य
३८. नाडी
३९. जिन्नस
४०. पद्धत
४१. एक प्रायश्चित कर्म
४२. चिंता
४४. कर्णाची उपाधी
४५. सगेसोयरे
४७. बहुपेडी साखळी
४८. वावडी, ऐकीव गोष्ट
५०. आभाळ
५१. अदृश्य
५४. पर्वत
५६. खण पण चोळीचा नव्हे
५७. पोपट
५९. बाणेदार स्त्री, जयश्री गडकर यांचा गाजलेला चित्रपट
६१. मृदंग
६३. लक्ष्मी
६४. कोर्टातील विरुद्ध पक्ष
६६. 'जैसे थे' परिस्थिती
६७. फटफजिती होईल असे
७०. बाण
७२. पाणी ओघळून जाईल असा उतार
७३. मुलगा, पुत्र
७४. एकत्रित भोजन
७५. नवलाची कामगिरी

## उभे शब्द

१. गृहमंत्री सुनेच्या लेखी सासूबाई म्हणजे –
२. प्रवाह
३. ललाट
४. दुर्लक्ष, हेळसांड
५. वाळवंट
६. अणकुचीदार
७. तोंड लपवून स्वदेश सोडण्याची वेळ आलेला
८. धनुष्यबाण
११. लुटालुट
१२. हिंदीत काकडी
१४. ताबडतोब पैसे मोजून
१६. गौरवर्णी, साजिरी
१८. स्तर
१९. बारीकसारीक, किरकोळ
२१. चूक, अवमान
२३. उणीव, कमतरता
२४. नव्या नोटेचा स्पर्श
२६. काखेत मावणारी घागर
२७. प्रशंसेचा उद्गार
२८. सत्त्वयुक्त
२९. त्वरित, अचानक
३१. हा प्रामाणिक असेल तर देशाची तिजोरी भरते
३२. गावभर स्वैर भटकणारी
३४. नातेवाईक
३७. मोबदला, परिणाम
४३. पाणी, आयुष्य
४५. हिंदीत अपवित्र
४६. कोट, किल्ला
४९. रममाण झालेला
५२. पावलोपावली, सतत
५३. पाच दिवस काम असेल तर हा देखील सुट्टीचा दिवस
५५. चांदोबाची सुट्टी!
५८. दागदागिने
६०. फार, खूप
६२. प्राप्ती, आवक
६५. घाव, प्रहार
६७. सोने
६८. उणीव पण न भासणारी
६९. राज्य
७१. ज्वाला, दाह

## आडवे उत्तर

१.सुधारक ४.हरणटोळ ७.पनवती ९.धाक
१०.पारायण ११.कसारा १२.खीळ १३.गदारोळ
१५.गंगोदक १७.मंथरा
१८.पायल २०.रखवालदारी २१.आत
२२.हाक २४.करंगळी २४अ.नस २५.कळक
२७.वार २८.कसरत ३०.वळकटी
३३.हकनाक
३५.सहा ३६.डफ ३८.शीर ३९.नग
४०.रीत ४१.गोदान ४२.काळजी
४४.दानवीर ४५.नातलग ४७.गोफ
४८.वदंता
५०.नभ ५१.गडप ५४.नग ५६.कप्पा
५७.कीर
५९.मानिनी ६१.पखवाज
६३.कमला ६४.प्रतिवादी ६६.रमारम
६७.हास्यास्पद
७०.शर ७२.पाणलोट ७३.तनय
७४.अंगतपंगत ७५.करामत

## उभे उत्तर

१.सूचनामंत्री २.धारा ३.कपाळ ४.हयगय ५.रण
६.टोकदार ७.परागंदा
८.तीरकमठा ११.पळवापळव १२.खीरा
१४.रोख १६.गोरीगोमटी १८.पातळी
१९.लहानसहान २१.आगळीक २३.कसर
२४.करकरीत २६.कळशी २७.वाह २८.कसदार
२९.तडकाफडकी ३१.करदाता ३२.नगरभवानी
३४.नातलग ३७.फळ ४३.जीवन ४५.नापाक
४६.गड ४९.दंगलेला ५२.पदोपदी ५३.शनिवार
५५.अमावस्या ५८.रकमपात ६०.अतिशय
६२.जमा ६५.वार ६७.हाटक ६८.ददात
६९.प्रांत ७१.आग




## थोडक्यात/ संक्षिप्त



### न्यूझीलंडने इतिहास घडवला! महिलांच्या क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच असे घडले

**नवी दिल्ली**–न्यूझीलंड महिला संघ आणि दक्षिण आफ्रिका महिला संघ या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विजय मिळवला होता. तर दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडने सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला आहे. दक्षिण आफ्रिकेने या सामन्यातील पहिल्या डावात ३४६ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडला हा सामना जिंकण्यासाठी सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करायचा होता. या आव्हानाचा पाठलाग करताना अमेलिया केरने नाबाद १७९ धावांची खेळी करून न्यूझीलंडला २ गडी राखून विजय मिळवून दिला.
महिला क्रिकेटमध्ये याआधी इतक्या मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला गेला नव्हता. त्यामुळे न्यूझीलंडला हा सामना जिंकण्यासाठी इतिहास घडवायचा होता. जेव्हा संघ अडचणीत होता, त्यावेळी संघाची कर्णधार अमेलिया केर खंबीरपणे उभी राहिली. केरने १३९ चेंडूंचा सामना करत नाबाद १७९ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने २३ चौकार आणि १ षटकार मारला. तिचं द्विशतक थोडक्यात राहून गेलं.या सामन्यात न्यूझीलंड महिला संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने दमदार सुरूवात केली.

### मी जेव्हा..निवृत्तीच्या चर्चांवर मोहम्मद शमीने सोडले मौन

मुंबई–टीम इंडियासोबत आयसीसी २०२५ चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा मोहम्मद शमी अचानक गायब झाला. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर, शमीचा आयपीएल २०२५ चा हंगाम खराब गेला आणि तेव्हापासून तो कोणत्याही फॉरमॅटमध्ये टीम इंडियामध्ये परतलेला नाही. यामुळे त्याच्या निवृत्तीबद्दल भारतीय क्रिकेटमध्ये चर्चा सुरु झाल्या होत्या. पण आता त्याने यावर आपले मौन सोडले आहे.
शमी २०२५–२६ च्या संपूर्ण हंगामात बंगाल क्रिकेट संघाकडून सातत्याने देशांतर्गत क्रिकेट खेळला. त्याने सर्व फॉरमॅटमध्ये चांगली कामगिरी केली, तरीही अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. आता, शमी आयपीएल २०२६ च्या हंगामात लखनऊ सुपर जायंट्सकडून खेळण्यास तयार आहे.निवृत्तीबद्दल त्याने एक मुलाखतीत सांगितले की, सोप्या भाषेत सांगायचे तर, मी जेव्हा थकेन तेव्हा निवृत्त होईन आणि मी सध्या निवृत्तीचा विचार करत नाहीये. असे विचार तुम्हाला मागे खेचतात. जरी तुम्ही त्याबद्दल विचार केला, तरी तुम्ही स्वत:ला थकलेले आणि पराभूत समजत असता. मी तशा कोणत्याही गोष्टीचा विचार करत नाही. ज्या दिवशी तुम्ही सकाळी उठून विचार कराल, मफ्मला कंटाळा आला आहे,फ्फ त्या दिवशी तुम्हाला खेळ सोडावा लागेल. मी फक्त खेळाचा आनंद घेत आहे आणि सकारात्मक विचार करत आहे.

### संघर्षातून उभे केले कोट्यवधींचे साम्राज्य, घरात टीव्हीही नव्हता, पण

**अकोला**–इंडियन प्रीमियर लीगमधील राजस्थान रॉयल संघ तब्बल १५ हजार २८६ कोटी रुपयात विकत घेणाऱ्या अमेरिकेतील प्रसिद्ध उद्योजक कैलास (कल) सोमाणी यांचे विदर्भाशी खास नाते आहे. ते मूळचे वाशीमकर आहेत. लहानपणापासून त्यांना क्रिकेटची प्रचंड आवड. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म घेतलेल्या कल सोमाणी यांनी संघर्षातून कोट्यवधींचे मोठे साम्राज्य निर्माण केले. त्यांची यशस्वी वाटचाल नव्या पिढीसाठी प्रेरणादायी व आदर्श ठरत आहे.आयपीएल चषकाचा हंगाम नुकताच सुरू झाला. पहिला आयपीएल चषक जिंकणारा राजस्थान रॉयल संघ अमेरिकेतील उद्य–ोजक कल सोमाणी यांनी १.६३ अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजेच १५२८६ कोटी रुपयांना खरेदी केला. त्यामुळे कल सोमाणी विशेषत: भारतात प्रकाशझोतात आले. त्यांची पार्श्वभूमी काय याची चर्चा रंगू लागली.वाशीममध्ये जन्म, शेगावला उच्चशिक्षण
१५ ऑगस्ट १९७४ रोजी वाशीम येथे जन्मलेल्या कैलास सोमाणी यांचे बालपण सर्वसामान्य कुटुंबात गेले. वडील स्व.

# लखनौच्या पराभवानंतर गोयंका पंतवर संतापले?



**नवी दिल्ली**:आयपीएल २०२६ मधील पहिल्याच सामन्यात लखनौ सुपर जायंट्सला पराभवाला सामोरं जावं लागलं. संघाच्या या पराभवानंतर म ालक संजीव गोयंका मैदानावर उतरत ऋषभ पंतशी संवाद साधताना दिसले.
ऋषभ पंतच्या नेतृत्त्वाखालील लखनौ सुपर जायंट्स संघाला दिल्ली कॅपिटल्सकडून हंगामाच्या सलामीच्या सामन्यात पराभवाला सामोरं जावं लागलं. समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्सच्या भागीदारीच्या बळावर दिल्लीने ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. यासह संघाच्या पराभवानंतर लखनौ संघाचे मालक पुन्हा एकदा मैदाना–वर उतरले आणि ऋषभ पंत–कोचिंग स्टाफसह चर्चा करतानाचे त्यांचे फोटो, व्हीडिओ व्हायरल झाले आहेत. २०२३ मध्ये केएल राहुलला ज्याप्रम ाणे त्यांनी भर मैदानात सुनावलं होतं, तसाच काहीसा प्रकार यावेळेस दिसला. आयपीएल २०२६ च्या सलामीच्या सामन्यानंतर लखनौ सुपर जायंट्सच्या गटात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. हंगामातील आपल्या पहिल्याच सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून लखनौ सुपर जायंट्सला सहा गडी राखून दारुण पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर, लखनौ संघाचे मालक संजीव गोएंका, कर्णधार ऋषभ पंत आणि मुख्य प्रशिक्षक जस्टिन लँगर यांच्यात मैदानावर झालेल्या जोरदार शाब्दिक चकमकीने लक्ष वेधून घेतलं.
पराभवानंतर मालक संजीव गोयंकांची कॅप्टन–कोचसह गंभीर चर्चा
दिल्लीविरुद्धच्या पराभवानंतर, लखनौचे इतर खेळाडू दिल्ली कॅपिटल्सच्या खेळाडूंशी गप्पा मारताना दिसत हो–ते, तर दुसरीकडे संजीव गोएंका ऋषभ पंत आणि कोच जस्टिन लँगर यांच्याशी गंभीर चर्चा करताना दिसले. संभाषणादरम्यान, ते काहीतरी समजावून सांगत होते, तर पंतही आपले विचार म ांडत होता. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. चाहत्यांनी पुन्हा एकदा लखनौ संघाचे मालक संजीव गोयंका यांना सोशल मीडियावर ट्रोल केलं आहे.
या व्हिडिओमुळे चाहत्यांना केएल रा–हुल लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार असतानाच्या एका जुन्या घटनेची आठवण झाली. एका सामन्यात पराभव झाल्यानंतर संजीव गोयंका मैदाना–वर उतरत केएल राहुलला सर्वांसमोर सुनावताना दिले. हा संपूर्ण प्रकार सामन्यादरम्यान कॅमेऱ्यात कैद झाला आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.
लखनौ सुपर जायंट्सकडून दिल्ली कॅपिटल्सला विजयासाठी १४२ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्स सुरुवातीला संघर्ष करताना दिसत होती. मात्र, समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी डाव सावरला आणि नंतर आक्रमक फलंदाजी करत संघाला विजय मिळवून दिला.समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी ११९ धावांची भागीदारी केली. यामुळे साम न्याचे चित्र पूर्णपणे पालटलं. रिझवीने ४७ चेंडूंमध्ये नाबाद ७० धावा केल्या, तर स्टब्सने ३२ चेंडूंमध्ये महत्त्वपूर्ण ३९ धावा केल्या. दोघांनी मिळून संघाला केवळ १७.१ षटकांत विजय मिळवून दिला.

## पहिल्यांदाच चेस झाले इतके रन!

मुंबई–भारतामध्ये सध्या आयपीएलचा धमाका सुरू असतानाच आंतरराष्ट्रीय क्रिकेटम ध्ये नवा इतिहास घडला आहे. वनडे क्रिकेटमध्ये १ एप्रिल २०२६ ही तारीख इतिहासाच्या पानावर लिहिली गेली आहे. न्यूझीलंडच्या टीमने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडेमध्ये हा वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. महिला वनडे क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच इतका मोठा स्कोअर चेस केला गेला आहे. न्यूझीलंडच्या टीमने हा विश्वविक्रम केला, न्यूझीलंडची स्टार बॅटर अमेलिया केरने या सामन्यात शतक ठोकलं. न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला टीममध्ये वनडे सीरिज सुरू आहे. या सामन्यात पहिले बॅटिंग करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने ५० ओव्हरम ध्ये ६ विकेट गमावून ३४६ रनचा स्कोअर केला. दक्षिण आफ्रिकेकडून एनेके बॉशने ९० बॉलमध्ये ९१ रन केले, पण तिला शतक पूर्ण करता आलं नाही. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉलव्हार्टने ७४ बॉलमध्ये ६९ रनची खेळी केली, तर क्लो ट्रायोनने शेवटच्या काही ओव्हरमध्ये जलद रन केले. क्लो ट्रायोनने २५ बॉलमध्ये ५२ रन ठोकले.न्यूझीलंडला हा सामना जिंकण्यासाठी ३४७ रनचं आव्हान मिळालं. याआधी महिला वनडे क्रिकेटमध्ये कधीच एवढ्या मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला गेला नव्हता, त्यामुळे दक्षिण आफ्रिका हा सामना अगदी लगेच जिंकेल,, असं वाटत होतं, पण न्यूझीलंडची नवीन कर्णधार अमेलिया केरने दक्षिण आफ्रिकेच्या स्वप्नांवर पाणी फिरवलं. न्यूझीलंडची ओपनर सुझी बेट्स फक्त ८ रनवर आऊट झाली. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर अमेलिया केर बॅटिंगला आली. अमेलियाला दुसऱ्या बाजूने कुणीच साथ देत नव्हतं, पण तरीही ती एकटी किल्ला लढवत होती.अमेलियाच्या झुंजार शतकाच्या जोरावर न्यूझीलंडने ४९.४ ओव्हरमध्ये ३५० रन करून हा सामना जिंकला. अमेलियाने १३९ बॉलमध्ये नाबाद १७९ रनची धमाकेदार खेळी केली, यात तिने एक सिक्स आणि २३ फोर लगावले. न्यूझीलंडचा विजय होत नाही तोपर्यंत एमिलिया केर खेळपट्टीवर टिकून राहिली. एमिलियाला इसाबेला गेजने साथ दिली, तिने ४८ बॉलमध्ये ६८ रन केले.याआधी महिला वनडेमध्ये सगळ्यात मोठ्या आव्हाना–चा पाठलाग करण्याचा विक्रम भारतीय महिला टीमच्या ना–वावर होता. भारताने वनडे वर्ल्ड कपदरम्यान ऑस्ट्रेलियाने केलेल्या ३३८ रनच्या आव्ह–ानाचा पाठलाग करताना ५ विकेट गमावून ३४१ रन केले होते.

## अर्जुन तेंडुलकरने सांगितले मुंबई इंडियन्स सोडण्याचे खरे कारण



मुंबई–भारतीय क्रिकेट संघाचा म हान फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरला यावर्षी तरी आयपीएलमध्ये खेळायला मिळणार की नाही? याकडे सर्वांचं लक्ष आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामात अर्जुन तेंडुलकर लखनऊ सुपरजायंट्स संघासोबत नव्याने सुरुवात करणार आहे. अर्जुन तेंडुलकरने २०२१ मध्ये आयपीएल खेळण्यास सुरुवात केली होती. मुंबई इंडियन्स संघाने त्याला विकत घेतलं होतं. २०२५ पर्यत तो मुंबई इंडियन्ससोबत होता. पण यादरम्यान त्याला अपेक्षित संधी मिळाली नाही. मुंबई इंडियन्ससोबतच्या ४ वर्षांमध्ये त्याला फक्त पाचच सामने खेळता आले. दरम्यान आता त्याला लखनऊ संघाकडून तरी संधी मिळणार? हे पाहणं औत्सुक्याचं आहे. लखनऊ संघातून अद्याप त्याने पदार्पण केलं नसलं तरी, मुंबईच्या तु–लनेत त्याला जास्त सामने खेळायला मिळतील अशा अपे–क्षेने तो लखनऊ संघात आला आहे.अर्जुन तेंडुलकरने शुभांकर मिश्राच्या पॉडकास्टला हजेरी लावली. यावेळी त्याने मुंबई इंडियन्समधील अनुभव आणि त्यांच्याकडून देण्यात आलेल्या मर्यादित संधींवर भाष्य केले. मफ्तू मुंबई इंडियन्स संघातून मर्यादित सामने खेळलास, गोलंदाजाही केलीस. तुझा चेंडू चांगला स्विंग होत होता. हे पाहता तुला जास्त संधी मिळायला हवी होती का?,फ्फ असा प्रश्न अर्जुनला विचारण्यात आला.
त्यावर उत्तर देताना अर्जुनने सांगितले की, मफ्फकोणाला असे वाटत नाही? कोणाचीही बेंचवर बसण्याची इच्छा नसते. पण मला कठोर परिश्रम करायचे आहेत आणि जेव्हा संधी मिळेल तेव्हा चांगली कामगिरी करायची आहेफ्फ अर्जुनला यावेळी आयपीएलमधील वादग्रस्त इम्पॅक्ट प्लेअरच्या नियम ासंदर्भात विचारण्यात आले. भारताच्या अनेक आजी–माजी खेळाडूंनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. अर्जुननेही या मतांवर सहमती दर्शवली. क्रिकेट हा ११ खेळाडूंचा खेळ असून, त्याप्रकारेच खेळला पाहिजे असे अर्जुन म्हणाला.

## रवींद्र जडेजाची जबरदस्त गोलंदाजी

गुवाहटी : इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत अनेक भारतीय आणि परदेशी खेळाडू वेगगेळ्या हंगामात संघ बदलून मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले आहे. यापुढेही हे चित्र दिसून येईल. पण जगातील सर्वात मोठी स्पर्धा असलेल्या टी–२० लीगमध्ये काही मोजके खेळाडू आहेत ज्यांनी अनेक वर्षे एकाच फ्रँचायझीसोबत खेळत त्या संघाच्या जर्सी आणि चाहत्यांसोबत एक अनोख नाते निर्माण केले आहे. त्यातील एक नाव म्हणजे रवींद्र जडेजा.
यंदाच्या हंगामात राजस्तान रॉयल्सच्या ताफ्यातून उतर–लेला जड्डू मागील १२–१३ वर्षी चेन्नईचा चेहरा होता. पण ट्रेड डीलमुळे त्याचा संघ बदला अन् तो पुन्हा राजस्तान रॉयल्सच्या ताफ्यात गेला. त्यामुळेच आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील गुवाहटीच्या मैदाना–तील सामन्यात रवींद्र जडेजा भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. एका बाजूला त्याने रॉकस्टार अशी ओळख देणाऱ्या संघाची जर्सी पुन्हा परिधान केली. पण गुलाबी जर्सीतही त्याने फॉरव्हरचा फिव्हर दाखवून दिला. राजस्थान रॉयल्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स यांच्यातील सामन्यातील हा भावूक क्षण सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. गुवाहटी बरसापारा क्रिकेट स्टेडियममध्ये जर्सी बदलून मैदानात उतरल्यावर रवींद्र जडेजाने आपल्या गोलंदाजीतील धमक दाखवून दिली. एकाच षटकात त्याने इम्पॅक्ट प्लेरच्या रुपात मैदानात उतरलेल्या सरफराज खानसह मॅच सेट करण्याची ताकद असलेल्या शिवम दुबेला स्वस्तात तंबूत धाडले. या विकेटनंतर त्याने आक्रमक अंदाजात सेलिब्रेशन केल्याची चर्चाही रंगली. पण त्याच वेळी त्याने येलो जर्सीवर प्रेम आणि आदराची भावनाही जपल्याचा खास क्षण पाहायला मिळाला.

## पंजाब किंगचे गोलंदाज चमकले

मुल्लानपूर : आयपीएल स्पर्धेतील श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्ज आणि शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स यांच्यातील चौथा सामना मुल्लानपूरच्या मैदानात खेळवण्यात आला. या सामन्याआधी पंजाबच्या संघाने नाणेफेक जिंकली. आणि प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम गोलंदाजी करताना पंजाबचे गोलंदाज चमकले. फिरकीपटू युझवेंद्र चहल आणि विजयकुमार यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तर मॅक्रो जॅसन याने १ बळी टिपला. पंजाबच्या या गोलंदाजीमुळे गुजरातच्या संघाने २० षटकात १६२ धावा केल्या.

## कुपर कॉनोलीने जागेवरून खेचला १०३ मीटर लांब षटकार! राशिद खानही झाला अवाक



मुंबई–आयपीएल २०२६ स्पर्धेत मंगळवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या साम न्यातील शेवटच्या षटकात पंजाब किंग्ज संघाने विजय मिळवला आणि स्पर्धे तील पहिल्या विजयाची नोंद केली. या सामन्यात धावांचा पाठलाग करताना २२ वर्षीय कुपर कॉनोलीने तुफान फटकेबाजी केली. त्याने ४४ चेंडूंचा सामना करत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ७२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने पंजाब किंग्ज संघाने ३ गडी राखून विजयाची नोंद केली. या खेळीदरम्यान त्याने १०३ मीटर लांब षटकार खेचला. ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या गुजरात टायटन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १६२ धावा केल्या. पंजाब किंग्ज संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पंजाब किंग्ज संघाला हवी तशी सुरूवात करता आली नाही. सलामीला आलेला प्रियांश आर्य स्वस्तात माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कुपर कॉनोलीने गुजरातच्या गोलंदाजांचा चांगलाच सम ाचार घेतला. यादरम्यान त्याने अनुभवी गोलंदाज राशिद खानच्या गोलंदाजीवर खणखणीत षटकार खेचला.वेगव–ान गोलंदाजाच्या गोलंदाजीवर जागेहून लांब षटकार खेचणे इतके जड जात नाही. कारण गोलंदाजीच्या गतीचा वापर करून सहज मोठा फटका मारता येतो. पण फिरकी गोलंदाजाविरूद्ध फलंदाजी करताना जागेहून मोठा फटका मारणे इतके सोपे नसते. पण कुपर कॉनोलीने राशिद खानच्या गोलंदाजीवर जागेवर उभं रा–हून १०३ मीटर लांब षटकार खेचला. तर झाले असे की, गुजरात टायटन्स संघाची गोलंदाजी सुरू असताना, ८ वे षटक टाकण्यासाठी राशिद खान गोलंदाजीला आला. या षटकातील दुसरा चेंडू कुपर कॉनोलीने लेग साईडच्या दिशेने पूर्ण ताकदीने मारला. हा १०३ मीटर लांब षटकार पाहून जगातील नंबर १ गोलंदाज म्हणून ओळखला जाणारा राशिद खानही आश्चर्यचकीत झाला.या सामन्यात श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या गुजरात टायटन्स संघाने २० षटकांअखेर ६ गडी बाद १६२ धावा केल्या. गुजरातकडून फलंदाजी करताना शुबमन गिलने ३९ धावांची खेळी केली. तर जोस बटलरने ३८ धावा केल्या. यासह ग्लेन फिलिप्सने २५ धावांचे योगदान दिले. पंजाब किंग्जला हा सामना जिंकण्यासाठी १६३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पंजाबकडून कुपर कॉनोलीने सर्वाधिक ७२ धावांची खेळी केली. तर प्रभसिमरन सिंगने ३७ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने १८ धावा केल्या. हा सामना पंजाबने ५ चेंडू शिल्लक ठेवून ३ गडी राखून आपल्या नावावर केला.

# समीर रिझवीचा इम्पॅक्ट ! खिंड लढवली ; दिल्लीला मिळवून दिला थरारक विजय

**नवी दिल्ली:** लखनौ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात झालेल्या सामन्यात समीर रिझ–वीने दमदार अर्धशतकी खेळी करून दिल्लीला विजय मिळवून दिला.
आयपीएल २०२६ स्पर्धेतील पाचवा सामना लखनौ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. लखनौतील एकाना स्टेडियममध्ये पार पडलेल्या या साम न्यात लखनौ सुपर जायंट्स संघाला पराभवाने सुरूवात करावी लागली आहे. प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपर जायंट्स संघाचा डाव अवघ्या १४१ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्स संघाकडून समीर रिझवी चमकला. दमदार अर्धशतकी खेळी करून त्याने दिल्ली कॅपिटल्स संघाला ६ गडी राखून विजय मिळवून दिला.
दिल्ली कॅपिटल्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १४२ धावा करायच्या होत्या. पण या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीला हवी तशी सुरूवात करता आली नाही. दिल्लीकडून केएल राहुल आणि पथुम निसंकाची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आली. पण केएल राहुल मोहम्मद शमीच्या पहिल्याच चेंडूवर झेलबाद होऊन म ाघारी परतला. त्यानंतर पथुम निसंका देखील एका धावेवर माघारी परतला.



तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या नितीश राणाने २ चौकार आणि १ षटकार मारला. पण तो १५ धावांवर बाद होऊन माघारी परतला. कर्णधार अक्षर पटेल देखील शून्यावर माघारी परतला.
समीर रिझवी या सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आला होता. त्याचा फलंदाजीत चांगलाच इम्पॅक्ट पाहायला मिळाला. त्याने ३७ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यासह ट्रिस्टन स्टब्ससोबत मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. स्टब्सने ३२ चेंडूत ३९ धावांची खेळी केली. तर समीर रिझवीने ७० धावांची खेळी करून संघाला विजय मिळवून दिला.
या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफ ेक जिंकला आणि लखनौ सुपर जायंट्स संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. लखनौकडून सलामीला आलेल्या मिचेल मार्शने ३५ धावांची खेळी करून दमदार सुरुवात करून दिली. पण त्यानंतर विकेट्सची रांग ला–गली. ऋषभ पंत ७, एडन मारक्रम ११, आयुष बदोनी ०, निकोलस पूरन ८ धावा करून माघारी परतला. तर अब्दुल समदने ३६ तर शाहबाज अहमदने १५ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या १४० पार पोह–ोचवली. पण १४१ धावांवर संघाचा संपूर्ण डाव आटोपला. दिल्लीकडून गोलंदाजी करताना लुंगी एन्गिडी आणि टी नटराजन यांनी प्रत्येकी ३–३ गडी बाद केले. तर कुलदीप यादवने २ अक्षर पटेलने १ गडी बाद केला.

## लातूर जिल्हा परिषदेच्यावतीने ५ एप्रिल रोजी किनगाव येथे मोफत मेंदूविकार तपासणी व औषधी वाटप शिबिराचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्या संकल्पनेतून मेंदूविकार असणाऱ्या बालकांसाठी मोफत तपासणी व औषधी वाटप करण्याची विशेष योजना जिल्हा परिषदेच्या ५ टक्के दिव्यांग राखीव निधीतून सन २०२५-२०२६ या वर्षात हाती घेण्यात आली आहे. या योजनेतंर्गत आरोग्य विभाग, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद लातूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांगजनांच्या मेंदूविकार आजारावर उपचार करण्यासाठी किनगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रविवार, ५ एप्रिल २०२६ रोजी एका विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये तज्ज्ञ मेंदूविकार तज्ज्ञांमार्फत लाभार्थ्यांची मोफत तपासणी व उपचार करून आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. तरी अहमदपूर, उदगीर व चाकूर परिसरातील मेंदूविकार असणाऱ्या लाभार्थ्यांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांनी मासिक विवरणपत्र ३० एप्रिलपूर्वी ऑनलाईन सादर करणे बंधनकारक

**लातूर/प्रतिनिधी :** सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार बंधनकारक असल्याने विवरणपत्र तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालयाचे https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नियोक्त्यांच्या लॉगइन मध्ये ईआर-१ सादर करताना पोर्टलवर एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉगइन मध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉगईन करुन डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लीक करावे, त्यानंतर एंटर ईआर-१ वर क्लीक करुन तिमाही विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करता येईल. याचा वापर करुन ३० एप्रिल, २०२६ अगोदर ईआर-१ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. हे विवरणपत्र सादर करताना काही तांत्रिक अडचण आल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## सहकारी संस्थांच्या चौकशीसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या नामतालिकेसाठी ३० एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ व ८८ अन्वये संस्थांच्या चौकशीसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नामतालिका तयार करण्यात येणार असून, यासाठी सहकार विभागातील ७० वर्षांखालील निवृत्त अधिकारी, निवृत्त न्यायाधीश, वकील आणि सनदी लेखापाल यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी दिली आहे.

या प्रक्रियेसाठीचे विहित अर्ज १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत विभागीय सहनिबंधक कार्यालय लातूर, तसेच लातूर, धाराशिव, बीड व नांदेड येथील जिल्हा उपनिबंधक आणि सर्व सहायक निबंधक कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. इच्छुकांनी पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह याच मुदतीत संबंधित कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# रुग्णसेवेच्या ४६ वर्षांच्या परंपरेला आधुनिकतेची जोड जाजू हॉस्पिटलच्या नूतन वास्तूचा प्रथम वर्धापन दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील जाजू हॉस्पिटलच्या अत्याधुनिक नूतन वास्तूचा प्रथम वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री गणेश आरतीने भक्तिमय वातावरणात झाली.

लातूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सन १९८० साली डॉ. रमेशचंद्र जाजू व डॉ. वसुधा जाजू यांनी जाजू हॉस्पिटलची स्थापना केली. आज या सेवावृत्तीने रुग्णसेवा देणाऱ्या संस्थेला तब्बल ४६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या परंपरेचा वारसा आज अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. चेतन जाजू व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रचना जाजू समर्थपणे पुढे नेत असून, ते दोघेही गेल्या १६ वर्षांपासून लातूरमध्ये रुग्णसेवा करत आहेत. या काळात त्यांनी अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया व यशस्वी उपचार






करून रुग्णांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण करण्याचे काम केले आहे. जाजू हॉस्पिटलच्या नूतन व अद्यावत वास्तूमध्ये सर्व स्पेशालिटीवरील उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. येथे मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, आयसीयू , अत्याधुनिक लेबर रूम, स्पेशल, डिलक्स व सेमी-स्पेशल रूम्स तसेच प्रगत फिजिओथेरपी व रिहॅबिलिटेशन विभाग उपलब्ध आहे. तसेच आर्थोपेडिक व गायनॉकॉलॉजी क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांना आधुनिक उपचार दिले जात आहेत.

विशेष म्हणजे या हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत हाडांच्या तसेच इतर विविध आजारांवर पात्र रुग्णांना मोफत उपचार दिले जात असून, रुग्णांना एकही रुपया खर्च करण्याची गरज भासत नाही. महात्मा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योज़नाही हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून या सुविधेचा लाभ आतापर्यंत असंख्य रुग्णांनी घेतला आहे. प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, डॉक्टर, सल्लागार, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह, हितचिंतक व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हॉस्पिटलचे व्यवस्थापक वसीम कादरी तसेच सर्व कर्मचारीवर्गाने परिश्रम घेतले.

# मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भंगार विक्रीतून ४५९.५२ कोटी रुपये कमावले

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने ''झिरो स्क्रॅप स्टेटस'' साध्य करण्याच्या आपल्या दृढ वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. भंगाराचे मौल्यवान, महसूल मिळवून देणाऱ्या मालमत्तेत रूपांतर करणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे, हे या प्रमुख मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत, मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भंगार विक्रीतून ४५९.५२ कोटी रुपयांचा महसूल यशस्वीरित्या प्राप्त केला आहे; ही रक्कम आर्थिक वर्ष २०२३-२४ नंतरची सर्वाधिक कामगिरी ठरली आहे. या यशासह, मध्य रेल्वेने केवळ रेल्वे बोर्डने निश्चित केलेले ४५० कोटी रुपयांचे उद्दिष्टच ओलांडले नाही, तर गेल्या दोन वर्षांतील आपली सर्वोत्तम कामगिरीही नोंदवली आहे.

विविध श्रेणींतील भंगार आणि टाकाऊ साहित्याची पद्धतशीर विल्हेवाट लावून ही महत्त्वपूर्ण कामगिरी साध्य करण्यात आली आहे. यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

**रेल्वे रूळ भंगार :** ४७,५०२ मेट्रिक टन

**लोह-धातू भंगार :** ३१,२९८ मेट्रिक टन

लोह व्यतिरिक्त-धातू भंगार : ३,६१६ मेट्रिक टन

**स्लीपर्स :** २,६५,६२५ नग

**रोलिंग स्टॉक :** ५० लोकोमोटिव्ह्ज, ७८ डबे आणि १३७ वॅगन्स

मध्य रेल्वेच्या भांडार विभागाने कुर्ला कटिंग यार्ड, ट्रॅक्शन मशीन वर्कशॉप (नाशिक), परळ वर्कशॉप आणि मनमाड

**गेल्या २ वर्षांतील महसुलाची सर्वोत्तम आकडेवारी**



वर्कशॉप यांसारख्या दुर्गम व विखुरलेल्या ठिकाणांसह, मध्य रेल्वेच्या सर्व पाचही विभागांमध्ये पडून असलेला भंगार माल शोधून काढण्यासाठी आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी अत्यंत सखोल व सुसूत्र मोहिमा हाती घेतल्या आहेत. या केंद्रित प्रयत्नांमुळे विक्री कामगिरीमध्ये लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

भुसावळ विभाग हा सर्वाधिक कामगिरी करणारा विभाग म्हणून समोर आला असून, त्याने १०५.३९ कोटी रुपयांच्या भंगार विक्रीची विक्रमी नोंद केली आहे; त्यानंतर माटुंगा कार्यशाळा (६८.३९ कोटी रुपये), नागपूर विभाग (६४.०२ कोटी रुपये), मुंबई विभाग (५५.४९ कोटी रुपये), पुणे विभाग (५० कोटी रुपये) आणि उर्वरित रक्कमेत इतर विभाग व उत्पादन घटकांचा वाटा आहे.

मध्य रेल्वेने वापरात नसलेल्या परंतु कार्यरत असलेल्या संसाधनांचा इष्टतम वापर करण्यावरही लक्ष केंद्रित केले. या संदर्भात, वापरात नसलेले परंतु कार्यरत असलेले एक रोटाटेक प्रिंटिंग मशीन भंगारात टाकण्याऐवजी, ८.७५ कोटी रुपयांच्या मूल्याने नाशिक प्रिंटिंग प्रेसकडे यशस्वीरित्या हस्तांतरित करण्यात आले. हा उपक्रम कार्यक्षम संसाधन वापर आणि सुज्ञ निर्णयप्रक्रियेद्वारे मूल्यवर्धन करण्याच्या मध्य रेल्वेच्या कटिबद्धतेवर प्रकाश टाकतो. या कामगिरीतून, 'झिरो स्क्रॅप मिशन' साध्य करण्याप्रती, तसेच आर्थिक सुज्ञता, कार्यसंचालनातील कार्यक्षमता आणि पर्यावरणीय शाश्वतता यांना चालना देण्याप्रती मध्य रेल्वेची सातत्यपूर्ण कटिबद्धता आणि दृढनिश्चय दिसून येतो.

# पशुवैद्यक महाविद्यालयाचे रासेयो शिबीर तोंडार येथे उत्साहात संपन्न

**उदगीर/प्रतिनिधी :** पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर तर्फे आयोजित सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष कार्यक्रम शिबीर तोंडार (ता. उदगीर) येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबीरामध्ये चतुर्थ वर्षाच्या ५७ विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल भिकाने, माजी संचालक विस्तार शिक्षण, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर हे उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजश्री गंदगे या उपस्थित होत्या. उद्घाटनप्रसंगी मंचावर गावचे सरपंच श्री. भरत कोचेवाड, श्री. नीळकंठ बिरादार (ग्रामपंचायत सदस्य), श्री. राजेंद्र पाटील (माजी पंचायत समिती सदस्य), श्री. रामेश्र्वर बिरादार (ग्रामपंचायत सदस्य), श्री. माधव पाटील इत्यादी उपस्थित होते.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. अनिल भिकाने यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये हवामान बदलाच्या काळात शाश्र्वत शेतीतून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी व पर्यायाने शाश्र्वत ग्रामविकासासाठी जलसंधारण, मृदासंधारण, वृक्ष संवर्धन, पशुपालन व दुग्धव्यवसायाचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजश्री गंदगे यांनी पशुपालकांच्या उन्नतीसाठी महाविद्यालय देत असलेल्या योगदानाबद्दल उपस्थिताना माहिती दिली.

सात दिवसीय विशेष कार्यक्रम शिबिरादरम्यान जनावरांसाठी गोचीडनाशक औषधाची फवारणी, जंतनाशक औषधाचे वाटप, पाळीव श्र्वानांसाठी रेबीज प्रतिबंधक लसीकरण, तणावमुक्त जीवनशैली, घरगुती पद्धतीने दुग्धजन्य पदार्थनिर्मिती, मुरघास निर्मिती, जलसंधारण व नैसर्गिक शेती इत्यादी विषयांवर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच या शिबिरामध्ये पाळीव पशुंसाठी मोफत पशुरोगनिदान व उपचार शिबीर आयोजित करण्यात आले. या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष कार्यक्रम शिबीरादरम्यान विविध कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी श्री. महादेव गोमारे, डॉ. अनिल पाटील, डॉ. सुरेश घोके, डॉ. गोपाल भारकड, डॉ. अशोक भोसले, डॉ. प्रफुल्ल पाटील, डॉ. प्रशांत मसारे, डॉ. मत्स्यगंधा पाटील, डॉ. संतोष चोपडे, डॉ. प्रवीण सावळे, डॉ. विवेक खंडाईत, डॉ. नरेंद्र खोडे, डॉ. शरद आव्हाड, डॉ. प्राजक्ता जाधव, डॉ. बालाजी कोंडरे व डॉ. अनिकेत नावकर तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संभाजी चव्हाण यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# दयानंद कला महाविद्यालयात २२ संशोधक विद्यार्थ्यांची पीएच.डी. पूर्व मौखिकी

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी विषयाचे संशोधन केंद्र असून सन १९९९ पासून या केंद्रात विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. शै. व. २०२५-२६ मध्ये एकूण १२६ विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. यामध्ये सुमारे १४ विद्यार्थी महाराष्ट्र आणि केंद्र शासनाच्या विविध योजनेतून अधिवास छात्रवृत्ती दिली जाते.

दि. ३०.०३.२०२६ रोजी सुमारे २२ विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. पूर्व मौखिकीचे आयोजन करण्यात आले होते. संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधनाचा अंतिम प्रारुप आराखडा सादर केला. यामध्ये इंग्रजी विषयाचे १०, हिंदी विषयाचे ०९ आणि मराठी विषयाचे ०३ संशोधक विद्यार्थी होते. एकाच दिवशी एवढ्या विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. पूर्व मौखिकीचे आयोजन करणे ही महाराष्ट्रातील एकमेवाद्वितीय घटना आहे. महाविद्यालयातील संशोधन केंद्र अंत्यत प्रगत असून महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सुमारे





एक लाख विस हजार ग्रंथ संख्या आहे. या ग्रंथसंख्येचा लाभ नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे संशोधक विद्यार्थी घेत आहेत. २२ विद्यार्थ्यांपैकी तीन अधिवास छात्रवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्व मौखिकी सादर केली. या विद्यार्थ्यांना शासनाकडून संशोधन कार्य पूर्ण होई पर्यंत सुमारे ४०,०००००/- (अक्षरी रु. चाळीस लाख फक्त) अधिवास शिष्यवृत्ती दिली जाते. महिन्याला सुमारे ३७ ते ४५ हजार शिष्यवृत्ती दिली जाते.

पीएच.डी. पूर्व मौखिकीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले तर पूर्व मौखिकीसाठी प्रा. डॉ. अंकुशकुमार चव्हाण यांनी परिश्रम घेतले. तसेच प्रा. राजकुमार मोरे, प्रा. अंगद भुरे आणि अधिवास छात्रवृत्तीधारक श्री. सागर यादव यांनी सहकार्य केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पूर्व मौखिकीचे आयोजन केल्याबद्दल संशोधन केंद्राचे कौतुक होत आहे.

# स्व. मुरलीधरराव पोतदार पुण्यस्मरणार्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण

**जळकोट/प्रतिनिधी :** जळकोट तालुक्यातील वांजरवाडा येथील श्री संत गोविंद स्मारक विद्यालयाचे कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय.. तितकेच मनमिळाऊ आदर्श व्यक्तीमत्व.. गुरूजी.. पंचक्रोशीतील एक प्रामाणिक व्यक्तिमत्व शाळेसाठी निस्वार्थी भूमिका ठेवणारे..माजी मुख्याध्यापक कै. मुरलीधररावजी पोतदार गुरुजी.. यांचे पाचवे पूण्यस्मरण दिना निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

ज्येष्ठ पत्रकार . विवेक पोतदार यांनी आपल्या वडिलांच्या (स्व.मुरलीधरराव पोतदार) पाचव्या पुण्यस्मरणार्थ मंगळवारी विद्यार्थ्यांना हे शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

वांजरवाडा येथील श्री संत गोविंद स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी शिंदे हे होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे प्रशासन अधिकारी सचिन काडवादे उपस्थित होते. तर यावेळी पंचायत समितीचे अरविंद पाटील, एच.एम. शेख, श्री डंबाळे, मिलिंद कांबळे, श्रीकांत कुलकर्णी, जेष्ठ पत्रकार विवेक पोतदार, माधव हासुळे, बालाजी दहिफळे, कुंभारे, मल्लिकार्जुन राजुरे, ज्ञानोबा टेकाळे, महेश अकुलवार, अल्लाउद्दीन चौधरी, पत्रकार माधव होनराव, कर्मचारी निळकंठ टाले आदि उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन माधव होनराव यांनी तर आभार माधव हासुळे यांनी मानले.



प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# परशुराम जयंती निमित्त समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन

## लातूरात परशुराम जयंतीची बैठकीत जोरदार तयारी

**लातूर/प्रतिनिधी :** राजराजेश्वर भगवान परशुराम जन्मोत्सव सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने यंदाही उत्साहात साजरा करण्यात येणार असून हा उपक्रम आता तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. संजय पांडे यांनी सुरू केलेला हा उपक्रम गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे.यंदाच्या उत्सवात व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, महिलांसाठी विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भगवान परशुराम मंदिरात यज्ञयागाचाही विशेष कार्यक्रम होणार आहे. समाजातील सर्व घटकांनी वर्षातून एकदा एकत्र येत परशुराम जयंती साजरी करावी, असा समितीचा मनोदय आहे.





यावर्षी प्रथमच वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. संतोष देशपांडे यांची अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या नेतृत्वाखाली आणि ज्येष्ठांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे नियोजन आहे. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत संघटित राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत ब्राह्मण सेवा संघ, लोकमान्य टिळक विचार मंच, माध्व मंडळ (उत्तरादी मठ), लक्ष्मी नृसिंह बचत गट, समर्थ अन्न सेवा, विद्यावर्धिनी प्रतिष्ठान, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, ब्राह्मण ऐक्य परिषद, इइछ ग्रुप, बॉन्ड ऑर्गनायझेशन, पुरोहित संघ तसेच विविध महिला गट आणि अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ङ्गअमृत योजनाफची माहिती समाजातील उद्योजकाना देण्याचे ठरले . तसेच इइछ महिला व पुरुष उद्योजकांसाठी प्रदर्शन भरविणे, १०० रक्तदात्यांचा संकल्प, तरुणांचा सहभाग वाढवणे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, इइछ महिला मंडळाच्या वतीने आनंदाची बातमी देण्यात आली असून, लातूरमध्ये ब्राह्मवृंद परिवारासाठी विशेष शॉपिंग फेस्टिवल आयोजित करण्यात येणार आहे. या फेस्टिवलमध्ये इइछ समूहातील महिला व पुरुषांना त्यांच्या व्यवसायातील उत्पादने विक्रीसाठी स्टॉल लावण्याची संधी मिळणार असून हे इइछ मेंबर साठी स्टॉल पूर्णपणे मोफत असणार आहेत. स्टॉल बुकिंगसाठी अनुराधा औसेकर व धनश्री जोशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जागा मर्यादित असल्याने लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.एकूणच, परशुराम जयंती निमित्ताने समाज एकत्र आणण्याचा आणि सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचा मोठा प्रयत्न यंदा पाहायला मिळणार आहे. अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष डॉक्टर संतोष देशपांडे यांनी दिली आहे.

### दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर मध्ये व्हर्च्युअल कॅम्पस ड्राइव्ह यशस्वी

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे झायडस–कॅडिला, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने व्हर्च्युअल कॅम्पस ड्राइव्हचे २८ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयातील डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे व मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या कॅम्पस ड्राइव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नामांकित औषधनिर्मिती कंपनीत करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातून मुलाखती देत आपल्या ज्ञान व कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.सदर निवड प्रक्रियेतून एकूण ११ विद्यार्थ्यांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली असून, या विद्यार्थ्यांना फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरिंग विभागात कार्य करण्याची संधी प्राप्त होणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरामणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापक व इतर कार्यालयीन कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कार्यकर्त्यांना अधिक सक्षम आणि अद्यावत करण्याचा भाजपाचा प्रशिक्षणातून प्रयत्न

## भाजपाच्या प्रशिक्षण शिबिर उद्घाटन प्रसंगी युवा नेते ऋषिकेश कराड

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी ही कार्यकर्त्यांची पार्टी असून कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा बलस्थान आहे सक्षम कार्यकर्ता घडला तरच पार्टी सक्षम घडणार आहे याच उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिरातून कार्यकर्त्यांना अधिक सक्षम आणि अद्यावत करण्याचा भाजपाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.





लातूर तालुक्यातील भाजपाच्या मुरुड मंडलातील कार्यकर्त्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते नांदगाव येथील कौशल्या सिल्क येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर मार्गदर्शक तुकाराम गोरे, मंडलाध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील आणि भाजयुमो मंडलाध्यक्ष किरण मुंडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या निवासी प्रशिक्षण शिबिरास मुरुड मंडळातील १०८ भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख सहभागी झाले होते.

सेवाभाव वृत्तीतून काम करणारे भाजपाचे कार्यकर्ते अधिक सक्षम व्हावे, त्यांच्यात जनसेवेची आणि देशभक्तीची भावना अधिक निर्माण व्हावी यासाठी भाजपाच्या वतीने सर्वत्र प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जात असल्याचे सांगून ऋषिकेशदादा कराड यांनी भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजनामुळे जनतेच्या जीवनमानात मोठी सुधारणा होत असल्याचे सांगून भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या विविध कल्याणकारी योजना गोरगरीब सर्वसामान्य गरजू पर्यंत पोहोचण्याचे काम करावे असे आव्हान केले.

प्रारंभी मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनामाची भूमिका विशद केली सूत्रसंचालन दिलीप पाटील यांनी केले. या प्रशिक्षण वर्गात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अमलबजावणी, सोशल मीडिया या विषयावर विविध क्षेत्रात तुकाराम गोरे, रोहिदास वाघमारे, महेश कणसे, दिलीप पाटील, प्रशांत साखरे यांच्यासह इतर अनेकांनी अत्यंत प्रभावी मनोगत व्यक्त केले.

### महिला धोरण व जागरुकता कार्यक्रम उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने दिनांक २८ मार्च २०२६ रोजी मुलींसाठी महिला धोरण आणि जागरूकता या विषयावर एक माहितीपूर्ण व प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांनी भूषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महिलांच्या सुरक्षा, शिक्षण आणि सशक्तीकरणासाठी शासनाच्या विविध धोरणांचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःची ओळख निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात लोकप्रशासन विभागाचे विभागप्रमुख डॉ. रामेश्वर खंदारे यांच्या प्रभावी प्रास्ताविकाने झाली. त्यांनी शासनाच्या महिला धोरणांबाबत सविस्तर माहिती देत, महिलांनी आपल्या हक्कांविषयी सजग राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. तसेच भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना दिलेले अधिकार व सन्मान यांचा विशेष उल्लेख करत त्यांनी विद्यार्थिनींना प्रेरित केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. गीता गिरवलकर यांनी विद्यार्थिनींना महिला धोरणांची सखोल माहिती देत त्यांचा दैनंदिन जीवनात प्रभावी वापर कसा करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांची सुरक्षा, कौटुंबिक अत्याचार प्रतिबंध, तसेच वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करत, कोणत्याही अन्यायाविरुद्ध ठामपणे आवाज उठवण्याचे आवाहन केले. विद्यार्थिनींसोबत थेट संवाद साधत त्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेत मार्गदर्शनही केले.

या कार्यक्रमाला लोकप्रशासन विभागातील प्रा. स्फूर्ती समुद्रे, प्रा. अश्विनी धायगुडे आणि प्रा. चैतन्य शिंदे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कामाक्षा मुदाळे यांनी आत्मविश्वासाने केले, तर आभार प्रदर्शन प्रा. स्फूर्ती समुद्रे यांनी व्यक्त केले. एकूणच, हा कार्यक्रम विद्यार्थिनींमध्ये महिला हक्क, सुरक्षा आणि सशक्तीकरणाबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला, अशी समाधानकारक प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

### श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, लातूरच्या थ्रो बॉल संघाची राज्यस्तरावर धडक; विभागीय स्पर्धेत मुलींच्या संघाचे दैदिप्यमान यश

**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'विभागीय शालेय थ्रो बॉल स्पर्धा २०२५–२६' मध्ये लातूरच्या श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या खेळाडूंनी आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक, तर १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे.

नांदेड येथे पार पडलेल्या या अटीतटीच्या सामन्यांमध्ये विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट ताळमेळ आणि चिकाटीचे प्रदर्शन केले. विशेषतः १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रतिस्पर्धी धाराशिव संघांना पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या यशामुळे श्री श्री रविशंकर विद्यामंदिर आणि लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विजयी खेळाडूंची नावे: १. संस्कृती शिवराम मलवाडे (संघनायक) २. अपूर्वा महेश गडगडे (उपसंघनायक) ३. श्रुती गोविंद कुंभार ४. वसुंधरा तानाजी सोनवणे ५. सायली दत्तात्रय धारेकर ६. श्रावणी प्रदीप पंडित ७. अन्वी विनोद डोंगरे ८. श्रावणी लिंबराज चिवडे ९. स्वरा राहुल चव्हाण १०. समृद्धी बालाजी गायकवाड ११. सिद्धी श्रीकृष्ण गडदे १२. हर्षदा चंद्रकांत मोरे

विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी केल्यानंतर, आता हे १९ वर्षांखालील संघ राज्यस्तरीय थ्रो बॉल स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत.

### हनुमान ..

मारुती गुण समुच्चय
उल्लेख पद्मपुराणात
पुरातन पत्रकार जणू
आपण राही ऋणात

सागर लंघून पोचला
लंका नगरीत क्षणात
निर्भय रामदूत खास
सामर्थ्य दावी रणात

उत्कृष्ट बातमीदार तो
असे गुप्तहेर साक्षात
लंका माहीत इत्यंभूत
कणकण असे लक्षात

सूक्ष्म रुप धारण करी
फिरला मुक्तते जनात
शोधून काढले सीतेला
शोकाग्र अशोकवनात

मोठी करुन शेपटीला
बैसला उच्चआसनात
युध्दपूर्व संधीची संधी
संदेश दिला सन्मानात

लंकादहन करे सावध
डंका वाजवी नगरात
खडान् खडा माहिती
जमा करी खबरबात

मारुतीचे अमूल्य असे
योगदान सार्थ अर्थात्
विमानअर्चनाकल्पात
दाखला मिळे ग्रंथात

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

# राष्ट्रीय सेवा योजनेतून सेवाभाव जोपासा; नेतृत्व घडते - डॉ. मल्लिकार्जुन करजगी

## जयक्रांती महाविद्यालयात युवक-युवती शिबिराचा समारोप संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांच्या वतीने संचालित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. विविध उपक्रमांनी परिपूर्ण असलेल्या या शिबिराचा समारोप समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.





या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. दिगंबर नेटके, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्या मनामध्ये सेवावृत्ती जोपासली, तर त्यांच्यातून जबाबदार आणि सजग नागरिक घडतात. विद्यार्थी दशेत नेतृत्वाचे गुण विकसित झाले, तर अशा शिबिरांच्या माध्यमातून समाजाला विविध क्षेत्रांत सक्षम नेतृत्व मिळते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी नेतृत्वाची पायाभरणी अशा उपक्रमांतूनच होत असते. त्यांच्या या विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव आणि नेतृत्वाची जाणीव अधिक दृढ झाली.

यावेळी डॉ. दिगंबर नेटके यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यक्तिमत्त्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना अत्यंत महत्त्वाची असून सेवा वृत्तीने केलेले कार्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लावते.

सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने यांनी आपल्या भाषणातून साहित्यिक दृष्टिकोन मांडत सांगितले की, कविता आणि गझल या सामाजिक जाणिवेतूनच जन्म घेतात. विद्यार्थ्यांमध्ये निस्वार्थ सेवा करण्याची भावना निर्माण झाली, तर ते केवळ चांगले नेतेच नव्हे, तर संवेदनशील साहित्यिकही घडू शकतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गीता वाघमारे यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक डॉ. केशव आलगुले यांनी सादर केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, शितल पवार, डॉ. रामेश्वर स्वामी, प्रा. शिवराज बाजुळगे, प्रा. प्रज्ञा स्वाम, श्री. जाधव रामदास, श्री. बजरंग चिवडे, श्री. अमित भालके, श्री. मयूर आवळे, डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, शितल पवार, जयश्री जमादार आदींनी विशेष परिश्रम घेतले. या नेतृत्व विकास शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि नेतृत्व गुणांचा विकास होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६